रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३१०
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ शुक्रवार, २९ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### अंतरंग

कर्जतमध्ये भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात २८ बकऱ्या ठार/२
१ जूनपासून रायगडात समुद्री मासेमारीला बंदी/५
वाशीत रविवारी ग्रँड फुटबॉल टूर्नामेंट/८

## कर्नाटकात सिद्धरामय्या समर्थकांनी जाळले राहुल गांधींचे फोटो



**बंगळुरू** : कर्नाटकच्या राजकारणात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या अंतर्गत संघर्षात मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना आपल्या पदावरून पायउतार व्हावे लागले आहे. दिल्लीत काँग्रेस हायकमांडसोबत झालेल्या मॅरेथॉन बैठकांनंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर आता ज्येष्ठ नेते डी.के. शिवकुमार हे मुख्यमंत्री होणार आहेत. सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच त्यांच्या समर्थकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. कर्नाटकातील कुरुबा समुदायाच्या वतीने रायचूर जिल्ह्यात काँग्रेस हायकमांडविरोधात जोरदार आंदोलन करण्यात आले. या सगळ्यासाठी काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व जबाबदार असल्याचा आरोप करत संतप्त कार्यकर्त्यांनी राहुल गांधींचे फोटो जाळले आणि काँग्रेस हायकमांडविरोधात घोषणाबाजी केली.

# महायुती एकजुटीने लढून जिंकणार!

## विधान परिषद निवडणुकीबद्दल उपमुख्यमंत्री शिंदेंचा विश्वास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी महायुती एकजुटीने निवडणूक लढवणार असून सर्व जागांवर विजय मिळवणार, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी महायुतीमध्ये कोणतेही मतभेद नसल्याचे स्पष्ट करत जागावाटप सन्मानाने होईल, असे सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच जागावाटपाचा फॉर्म्युला स्पष्ट केला असल्याचे सांगत "महायुती मजबूत आहे, आम्ही एकत्र काम करत आहोत आणि महाराष्ट्राचा विकास वेगाने पुढे नेत आहोत,"



असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत विचारले असता सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत पूर्णपणे संवेदनशील असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्याची माहिती त्यांनी दिली. कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय, न्यायमूर्ती शिंदे समितीची स्थापना आणि १० टक्के आरक्षण देण्याचे काम आम्ही केले, असे सांगत त्यांनी सरकारने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातूनही समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे नमूद केले. उर्वरित प्रश्न सोडवण्यासाठी सरकार सकारात्मक असून जरांगे यांना उपोषण करण्याची वेळ येऊ नये, ही सरकारची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

खासदार संजय राऊत यांच्या विधानांवर प्रतिक्रिया देताना शिंदे म्हणाले, महायुती मजबूत आहे आणि महाराष्ट्राचा विकास वेगाने सुरू असल्याने विरोधक अस्वस्थ झाले आहेत. भाजप हा देशातील नंबर एकचा पक्ष असून शिवसेना दुसऱ्या क्रमांकाची ताकद असल्याचे सांगत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता, "देवेंद्र फडणवीस यांच्यावर टोकाची भाषा करणाऱ्यांची आज काय अवस्था झाली आहे हे महाराष्ट्राने पाहिले आहे," असा टोला त्यांनी लगावला. यावेळी मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांच्या भेटीबाबत बोलताना महाराष्ट्राच्या विकासासाठी केंद्राशी समन्वय साधणे हे मुख्यमंत्री म्हणून कर्तव्यच असल्याचेही त्यांनी म्हटले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पंतप्रधान नरेंद्र मोदींशी दिल्लीत चर्चा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. २८) राजधानी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाच्या विविध प्रकल्पांबाबत पंतप्रधानांशी चर्चा केली.

भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्यांच्या प्रगतीबाबत पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट ही नेहमीच अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक ऊर्जा देणारी असते, अशी भावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी या भेटीनंतर व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस बुधवारपासून दिल्ली दौऱ्यावर असून केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह आणि केंद्रीय जलशक्तीमंत्री सी.आर. पाटील यांच्यासमवेत ऊस आणि कांदा उत्पादकांच्या विविध प्रश्नांबाबत तसेच राज्यातील सिंचन प्रकल्प, जलजीवन मिशनची कामे आदींबाबत महत्त्वपूर्ण बैठका झाल्या आहेत.

## माणगाव अल्पवयीन मुलीच्या हत्येप्रकरणी आरोपी ताब्यात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील पळसगाव ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या घरोशीवाडी येथील निधी राकेश उतेकर या १५ वर्षीय मुलीचा मृतदेह जंगलात आढळून आला होता. पोलिसांनी तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे २४ तासांच्या आत आरोपीला ताब्यात घेतले आहे.

निधी ही आपल्या कुटुंबासह मुंबईतील विलेपार्ले येथे राहत होती. ती सेंट झेव्हियर्स शाळेत शिक्षण घेत असून नुकतीच इयत्ता नववी उत्तीर्ण झाली होती. उन्हाळी सुट्टीसाठी सुमारे आठ दिवसांपूर्वी ती आईवडील आणि भावासह मूळगावी घरोशीवाडी येथे आली होती.

२५ मे रोजी रात्री नऊच्या सुमारास निधी वडिलांच्या मोबाइलवर बोलत घरातून बाहेर पडली. बराच वेळ उलटूनही ती परत न आल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध सुरू केला. परिसरात सर्वत्र शोधमोहीम राबविण्यात आली, मात्र तिचा काहीच मागमूस लागत नव्हता. पोलिसांसह फॉरेन्सिक टीम आणि श्वान पथकदेखील घटनास्थळी पोहचले.

घरोशीवाडीलगतच्या डोंगराळ आणि जंगल परिसरात २७ मे रोजी एका मुलीचा मृतदेह आढळल्याची माहिती ग्रामस्थांनी पोलिसांना दिली. त्यानंतर निधीच्या कुटुंबीयांना घटनास्थळी बोलावण्यात आले असता मृतदेह निधीचाच असल्याचे स्पष्ट झाले. तिच्या अंगावर जखमा दिसून आल्या.

माणगाव पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत घरोशीवाडी गावातच राहणाऱ्या आरोपीला ताब्यात घेतले आहे. शुभम उतेकर (३२) असे त्याचे नाव आहे. याबाबत माहिती देताना पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी वेगवेगळ्या प्रकारे आमचा तपास सुरू आहे. हत्या कशामुळे झाली, त्याची कारणे काय होती याचा शोध आम्ही घेत आहोत, अशी माहिती या वेळी दिली.

## नसरापूर प्रकरणातील नराधमावर आरोप निश्चित

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्याच्या नसरापूर (ता.भोर) येथील अल्पवयीन बालिकेवरील लैंगिक अत्याचार आणि खून प्रकरणातील खटल्याची सुनावणी गुरुवारी (दि.२८) विशेष न्यायालयात झाली. आरोपी भीमराव कांबळे याच्याविरोधात आरोप निश्चित झाले असून २८ दिवसांत पोलिसांनी सर्व न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

आरोपीला पहिल्यांदाच प्रत्यक्ष कोर्टात हजर करण्यात आले होते. कोर्टात युक्तिवाद करताना आरोपीच्या वकिलांकडून विरोध करण्यात आला, मात्र पुरावे असल्याने आरोपीवर आरोप निश्चिती करण्यात आली. या प्रकरणातील लैंगिक चाचणी, सीसीटीव्ही फुटेज या सगळ्याची तपासणी पुन्हा एकदा करण्यात आली. त्याचबरोबर दोषारोपपत्राची माहितीदेखील यावेळी कोर्टाला देण्यात आली. आता प्रकरणाची सुनावणी रोज 'इन कॅमेरा' पद्धतीने होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांमुळे देशाची प्रगती –महापौर नितीन पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



ज्यांनी आपल्याला प्रखर राष्ट्रभक्ती आणि देशाभिमान शिकवला तसेच जगण्याची शाश्वत अशी जीवनमूल्ये दिली, अशा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांवरच आज संपूर्ण देश प्रगती करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची ही घोडदौड सुरू आहे, असे प्रतिपादन पनवेलचे महापौर नितीन पाटील यांनी गुरुवारी (दि.२८) केले. सावरकर जयंतीनिमित्त शहरातील सावरकर चौकात आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना महापौर नितीन पाटील म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जीवन आणि त्यांचे विचार प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांनी दिलेली जीवनमूल्ये आजही तितकीच प्रासंगिक असून देशहितासाठी ती अंगीकारणे गरजेचे आहे. शेवटी त्यांनी सर्वांना सावरकर जयंतीच्या पुनश्च शुभेच्छा देऊन 'जय हिंद, जय महाराष्ट्र'च्या घोषणांनी आपल्या भाषणाचा समारोप केला. **(पान २ वर..)**

### निवडक

#### प्रसिद्ध शायर, गझलकार डॉ. बशीर बद्र यांचे निधन

**भोपाळ** : उर्दू साहित्यातील 'आधुनिक गझलांचे उस्ताद' आणि पद्मश्री पुरस्कार विजेते प्रसिद्ध शायर डॉ. बशीर बद्र यांचे गुरुवारी (दि.२८) वयाच्या ९१व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. फारसी आणि अरबी भाषेच्या क्लिष्ट चौकटीतून उर्दू गझलला बाहेर काढून ती सर्वसामान्यांच्या उंबरठ्यापर्यंत आणण्याचे श्रेय बशीर बद्र यांना जाते. त्यांच्या जाण्याने साहित्यातील एक सुवर्णकाळ संपल्याची भावना व्यक्त होत आहे.

#### जगज्जेता कार्लसनला हरवत प्रज्ञानानंदाचा ऐतिहासिक विजय

**ओस्लो** : भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानानंदाने नॉर्वे चेस स्पर्धेत जगातील अव्वल बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनला पराभूत करत मोठा उलटफेर घडवून आणला. क्लासिकल फॉरमॅटमध्ये या विजयासह तो ४.५ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आला आहे. विशेष म्हणजे यापूर्वी २०२४मध्येही त्याने माजी विश्वविजेत्याला धक्का दिला होता.

## घरकुल लाभार्थ्यांसाठी निधी मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत रखडलेल्या घरकुल बांधकामांना केंद्र आणि राज्य सरकारकडून नवीन निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार लाभार्थ्यांच्या खात्यात थकीत हप्ते लवकरच जमा होणार असून त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

ग्रामीण भागातील गरीब, शेतकरी, शेतमजूर, विधवा महिला तसेच बेघर कुटुंबांना पक्के घर मिळावे या उद्देशाने प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण राबवली जाते. मागील काही महिन्यांपासून निधीअभावी अनेक लाभार्थ्यांची घरकुल बांधकामे अर्धवट अवस्थेत थांबली होती. आता शासनाने प्रलंबित हप्त्यांच्या वितरणाला मंजुरी दिली आहे.

दरम्यान, नागरिकांना आता घरबसल्या मोबाइलवरून लाभार्थी यादी तपासण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या अधिकृत वेबसाईटवर जाऊन पर्याय निवडून राज्य, जिल्हा, तालुका आणि गावाची माहिती भरल्यानंतर संपूर्ण यादी पाहता येते. या यादीमध्ये लाभार्थ्यांचे नाव, घरकुल मंजुरी क्रमांक, बांधकामाची सद्यस्थिती तसेच हप्त्यांची माहिती उपलब्ध असते. त्यामुळे अर्ज मंजूर झाला आहे की नाही, किती हप्ते जमा झाले आणि पुढील प्रक्रिया काय आहे याची माहिती सहज मिळू शकते.

ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांसाठी प्रधानमंत्री आवास योजना मोठा आधार ठरत असून स्वतःच्या हक्काच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ही योजना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शासनाकडून निधी वितरणाला वेग मिळाल्याने आता अनेक कुटुंबांचे घरकुलाचे स्वप्न लवकरच साकार होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

## रायगडात महिला क्रिकेट प्रीमियर लीगचा थरार

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने प्रथमच रायगडातील उत्कृष्ट आणि उदयोन्मुख महिला खेळाडूंसाठी ट्वेन्टी-२० प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले आहे. गव्हाण (उलवे नोड) येथील सुसज्ज छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर गुरुवारी (दि.२८) या स्पर्धेचा शुभारंभ झाला.

उद्घाटन समारंभासाठी आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष राजेश पाटील, सहसचिव जयंत नाईक, सदस्य अरुण शिंदे, देवेंद्र पाटील, अभिजित तुळपुळे, मनोहर अहिर, छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट ॲकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू, सुजित ठाकूर, विनय पाटील, पंच चंद्रकांत म्हात्रे, रोहन पाटील, मंथन पाटील यांच्यासह खेळाडू व दर्शक उपस्थित होते.

स्पर्धेत समीरा हॅबिटेटेस अलिबाग जेट्स (संघमालक सचिन राऊळ), खोपोली क्रिकेट असोसिएशन (संघमालक यशवंत साबळे), अभि इलेव्हन अलिबाग (संघमालक अभिजीत तुळपुळे), चॅम्पियन्स क्रिकेट ॲकॅडमी खारघर (संघमालक आकाश पटारिया) अशा चार संघांचा समावेश आहे. स्पर्धा २८ मे ते २ जूनपर्यंत प्रथम साखळी व त्यानंतर बाद फेरीनुसार खेळली जाणार आहे.

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व संघांतील खेळाडूंना आरडीसीएच्या वतीने रंगीत गणवेश देण्यात आला आहे. स्पर्धा यूट्यूबच्या माध्यमातून लाइव्ह आहे. जिल्ह्यात पुरुषांच्या बरोबरीने महिला क्रिकेटला चालना देण्याच्या उद्देशाने आणि भविष्यात जिल्ह्यातील महिलांचा संघ मजबूत करण्यासाठी ही स्पर्धा घेण्यात येत असल्याचे आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले.



# ग्रामविकास भवनातून ग्रामीण प्रशासनाला मिळणार नवी दिशा -ग्रामविकासमंत्री गोरे

**मुंबई : प्रतिनिधी**

खारघर, नवी मुंबई येथे उभारण्यात आलेल्या ग्रामविकास भवन या शासकीय इमारतीची गुरुवारी (दि. २८) ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी पाहणी केली. ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रशासकीय समन्वय तसेच प्रशिक्षण उपक्रमांसाठी हे संकुल महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे.



यावेळी ग्रामविकास भवनातील विविध प्रशासकीय विभाग, प्रशिक्षण कक्ष, बैठकींसाठी उपलब्ध सुविधा तसेच इतर पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील विकासकामांना अधिक गती देण्यासाठी सक्षम व आधुनिक प्रशासकीय यंत्रणा उभारणे आवश्यक असून, त्यादृष्टीने ग्रामविकास भवनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

ग्रामीण विकास विभागाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता, समन्वय आणि कार्यक्षमता निर्माण व्हावी, यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.राज्यातील ग्रामविकासाशी संबंधित विविध उपक्रम, प्रशिक्षण प्रक्रिया आणि प्रशासकीय नियोजन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामविकास भवन हे केंद्र उपयुक्त ठरेल, असा विश्वास यावेळी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.

## भटक्या कुत्र्यांचा शेडमध्ये घुसून हल्ला; २८ बकऱ्या ठार, सहा गंभीर जखमी

### शेतीला जोडव्यवसाय म्हणून सुरू केलेले शेळीपालन उद्ध्वस्त

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील धुळेवाडी परिसरात भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने बकऱ्यांच्या कळपावर भीषण हल्ला चढवत मोठा कहर केला. या हल्ल्यात तब्बल २८ बकऱ्या मृत झाल्या असून ६ बकऱ्या गंभीर जखमी आहेत. जखमी बकऱ्यांचीही जगण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याची माहिती शेतकरी तानाजी मारुती धुळे यांनी दिली. या घटनेमुळे धुळे यांचे सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.



धुळे यांनी शेतीला जोड व्यवसाय म्हणून मोठ्या मेहनतीने शेळीपालन व्यवसाय सुरू केला होता. यासाठी त्यांनी ३५ बकऱ्या व बोकड खरेदी करून आणले होते. राजस्थानमधील अजमेर येथून बकऱ्या आणल्यानंतर गावाबाहेरील शेतात पत्र्याचे शेड उभारून त्यांचे संगोपन सुरू होते.

दि. २६ मे रोजी रात्री तीन वाजण्याच्या सुमारास अचानक बकऱ्यांचा आक्रोश आणि कुत्र्यांच्या भुंकण्याचा मोठा आवाज सुरू झाला. शेडजवळील परिसरात असलेल्या इमारतीत सुरक्षा रक्षकांना संशय आल्याने त्यांनी तात्काळ शेतकरी तानाजी धुळे यांना फोन करून माहिती दिली. माहिती मिळताच धुळे हे गावाबाहेर असलेल्या आपल्या बकऱ्यांच्या शेडकडे धावत पोहोचले. मात्र तोपर्यंत भटक्या कुत्र्यांनी बकऱ्यांवर हल्ला करून अक्षरशः संहार केला होता. शेतकरी घटनास्थळी पोहोचताच कुत्र्यांच्या झुंडीने तेथून पळ काढला.

सहा फूट उंचीचे सुरक्षित तारेचे शेड असतानाही कुत्र्यांनी बकऱ्यांवर हल्ला चढवला. पहाटेच्या अंधारात बकऱ्या मृत अवस्थेत पडल्या होत्या. काही गंभीर जखमी अवस्थेत तडफडत होत्या. हे दृश्य पाहून धुळे कुटुंबाला मोठा धक्का बसला. यामुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मेहनतीने उभा व्यवसाय उद्ध्वस्त झाल्याने धुळे कुटुंब हवालदिल झाले असून प्रशासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, तसेच भटक्या कुत्र्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

## अनेक राज्यांमध्ये वादळी पाऊस आणि गारपिटीचीही शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशभरात वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. सध्या देशातील अनेक राज्यांमध्ये कडाक्याचं ऊन पडत आहे. पण आता वातारणात मोठे बदल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. देशातील काही राज्यांमध्ये पुढच्या काही तासांत ११० किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार आहेत. यासोबत मुसळधार पावसाचादेखील अंदाज वर्तवण्यात आला आहे. नैऋत्यू मान्सून वेगाने आगेकूच करत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे अनेक राज्यांमध्ये वादळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली आणि हरियाणा इथे २९ मे च्या दिवशी हवामानात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. इथे ८० ते १०० किमी प्रतितास विगाने वादळ येण्याची शक्यता आहे. तसेच ३० मे रोजी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

उत्तर प्रदेशमध्येदेखील अशीच परिस्थिती असण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशात उद्या २९ मे रोजी ६० ते ८० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. इथे २८ आणि २९ तारखेला गारपीटची शक्यता आहे. तसेच २९ मे रोजी पश्चिम यूपीत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

बिहारमध्ये २८ आणि २९ हे दोन दिवस अतिमुसळधार पावसाचे असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. झारखंडला २८ मे ते १ जून या काळात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय धुळीचे वादळ देखील येण्याची शक्यता आहे. पश्चिम बंगालमध्ये २८ आणि २९ मे रोजी पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या इथे ५० ते ७० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांना देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तराखंडसह जम्मू आणि काश्मीरमध्ये वादळ येणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

मध्य प्रदेळातही वादळ आणि मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात ३० मे पर्यंत मुसळधार पावसाचा आणि गारपीटचा अंदाज वर्तवण्यात आल आहे. छत्तीगड राज्यात २९ आणि ३० मे या दोन दिवसांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात सध्या तरी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला नाही. काही ठिकाणी तुरळक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## नवी मुंबई, खालापूर बनणार 'डेटा सेंटर हब'

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला डिजिटल क्रांतीच्या नव्या शिखरावर नेण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत नवी मुंबई, खालापूर आणि पनवेल परिसरात 'डेटा सेंटर' आणि पायाभूत सुविधांच्या महाकाय प्रकल्पांना गती देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

नवी मुंबई हे आता केवळ शहर न राहता राज्यातील 'डेटा सेंटर'चे मध्यवर्ती आणि प्रमुख केंद्र म्हणून विकसित होणार आहे.

महापे आणि आसपासच्या परिसरात आधीच अनेक मोठे प्रकल्प सुरू झाले आहेत. या महाप्रकल्पाच्या विस्तारासाठी ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील शीळ-महापे भागात २५ एकर आणि पनवेल तालुक्यातील चिंध्रण, महाळुंगी, कानपोली येथे तब्बल ४२० एकर जागेचे संपादन सुरू करण्यात आले आहे. वीज-पाण्याची मुबलकता, परदेशी गुंतवणुकीला चालना महाकाय डेटा सेंटर्ससाठी प्रचंड प्रमाणात वीज आणि पाण्याची आवश्यकता असते. ही दोन्ही संसाधने महाराष्ट्रात मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने परदेशी आणि नामांकित कंपन्यांची मोठी गुंतवणूक येथे अपेक्षित आहे.

क्लस्टर म्हणून विकसित करण्याचे मोठे नियोजन सुरू आहे. आयटी, फिनटेकसह हजारो रोजगार या निर्णयामुळे केवळ डेटा सेंटर्सच नाही, तर आयटी, फिनटेक, लॉजिस्टिक पार्क, स्टुडिओ अपार्टमेंट्स आणि मनोरंजन केंद्रांनाही प्राधान्य दिले जाणार आहे.



## शिव प्रतिष्ठानकडून समाजोपयोगी उपक्रम

**उरण :** शिव प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष सत्यजित पाटील व मनीष कटेकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आले. लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी तसेच मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर यांच्या वतीने मोफत हेल्थ चेकअप कॅम्पचे आयोजन करण्यात आले. यासोबतच इयत्ता १० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व स्वच्छतादूतांचा सन्मान करण्यात आला. राबवलेल्या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## युवी स्पोर्ट्सने मिळवले विजेतेपद



**अलिबाग : प्रतिनिधी**

युवी स्पोर्ट्स अलिबागने उज्वल माणुसकी दमदार आमदार टी-२० अलिबाग प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. सिया अँड श्रियान वॉरियर्स नागाव हा संघ उपविजेता ठरला.स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून मनीष पाटील याला गौरविण्यात आले. ऋषिकेश राऊत याला उत्कृष्ट फलंदाजाचे तर रितेश तिवारी उत्कृष्ट गोलंदाजाचे पारितोषिक देण्यात आले. सौरभ पाटील यांची उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून निवड करण्यात आली.

श्रीजाई फ्युचर एलएलपीचे संचालक नितीन गांधी, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, रायगड जिल्हा परिषद सदस्य सचिन राऊळ, नवगावचे उपसरपंच निखिल कवळे, राकेश चव्हाण यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संदीप जोशी, विवेक ठाकूर, शाम नाईक, सुरेंद्र घरत व सुधाकर निषाद यांनी विशेष मेहनत घेतली.

## उरणमध्ये 'रंगोत्सव २०२६'ला उदंड प्रतिसाद; राष्ट्रीय विजेत्या बालकलाकारांचा सन्मान

**उरण : वार्ताहर**

बालकांच्या हातातील मोबाइलचे व्यसन सोडवून त्यांच्यातील सुप्त गुणांना कॅनव्हासवर आणण्याच्या उद्देशाने आयोजित 'रंगोत्सव २०२६' बॅच २ या भव्य चित्र प्रदर्शनाचा सांगता व पुरस्कार सोहळा जेएनपीए स्टाफ क्लब येथे मोठ्या उत्साहात पार पडला. योशिता आर्ट क्लासेस आणि मथुरा महादेव एज्युकेशन सेंटर यांच्या वतीने भरवलेल्या या अॅक्रेलिक कॅनव्हास पेंटिंग प्रदर्शनाने उरणमधील कलाप्रेमींची मने जिंकली.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ पत्रकार तृप्ती भोईर, महाराष्ट्र राज्य कला अध्यापक संघाच्या महिला अध्यक्षा प्रियंवदा तांबोटकर, मुख्याध्यापक व शिक्षक नेते रमाकांत गावंड आणि गणेश ठाकूर यांच्या हस्ते नटराज मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलन करून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. चित्रकार मिलिंद ठाकूर यांनी प्रास्ताविकात सांगितले, "आजची लहान मुले मोबाइलच्या आभासी दुनियेत गुंतली आहेत. या मानसिकतेमुळे मुले नैराश्य आणि चिडचिडेपणाकडे झुकत आहेत. त्यांना यातून बाहेर काढून जगाकडे सुंदर नजरेने पाहण्याचा कलात्मक दृष्टिकोन देणे हाच या ७ दिवसीय सेमिनारचा मुख्य हेतू होता.

मुलांनी कोऱ्या कॅनव्हासवर उमटवलेले रंग ही त्यांच्या कल्पकतेची आणि एकाग्रतेची पावती आहे."उरणच्या तीन राष्ट्रीय कन्यांचा विशेष गौरव चित्रकला क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर यश संपादन करून उरणचा डंका देशात पिटणाऱ्या तीन बालकलाकारांचा विशेष सत्कार करण्यात आला. साक्षी गणेश ठाकूर, भार्गवी रुपेश म्हात्रे आणि स्वरा रामानंद जाधव या गुणवंत विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह आणि योशिता मिलिंद ठाकूर हिने तयार केलेले गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. प्रदर्शनात सहभागी सर्व बालकलाकारांना प्रशस्तिपत्रक देऊन उत्साह वाढवण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार तृप्ती भोईर म्हणाल्या, "मिलिंद ठाकूर मुलांवर छान संस्कार करत आहेत. माझ्या मुलाला त्यांचे मार्गदर्शन लाभले आणि तो आजही स्केचिंगची कला जोपासत आहे. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालल्यास मुलांचे भविष्य उज्वल होईल."प्रियंवदा तांबोटकर म्हणाल्या, "आजच्या पिढीला मोबाइलपासून दूर ठेवायचे असेल तर चित्र, शिल्प, संगीत किंवा अभिनय अशा कलेशी त्यांची नाळ जोडून द्या. मिलिंद ठाकूर सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून उरणमध्ये मोठे कार्य करत आहेत. "रमाकांत गावंड म्हणाले, "मुलांनी रेखाटलेले प्रत्येक चित्र त्यांच्या अंतर्मनाचा आरसा असतो. अशी प्रदर्शने मुलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी गरजेची आहेत." कार्यक्रमाला उरण परिसरातील नागरिक व कलाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन


## स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांमुळे देशाची प्रगती -महापौर नितीन पाटील

या कार्यक्रमाला महापालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, सुमित झुंजारराव, गणेश कडू, नगरसेविका प्रिती जॉर्ज, स्नेहल ढमाले, केशवस्मृती पतपेढीचे चेअरमन अमित ओझे, सांस्कृतिक सेलचे जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, भाजपचे शहर मंडळ उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस रूपेश नागवेकर, चिन्मय समेळ, अनिमेष ओझे, अॅड. प्रफुल्ल म्हात्रे, पतपेढीचे वरिष्ठ व्यवस्थापक महेंद्र गोडबोले, सुषमा भिडे, विनीता जोशी, स्वाती कोळी, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, विशाल सावंत, केशवस्मृती पतपेढीचे कर्मचारी, स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि सावरकरप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तरुणांनी शेती व्यवसायात उतरावे -संजय धसाडे

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यासह ग्रामीण भागातील शेती व्यवसाय आज अनेक अडचणींना सामोरा जात असताना, शेती टिकवण्यासाठी तरुणांनी पुढे येणे ही काळाची गरज असल्याचे मत आदर्श शेतकरी संजय धसाडे यांनी व्यक्त केले आहे. बदलत्या काळात पारंपरिक शेतीबरोबर आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठेचे ज्ञान आणि योग्य नियोजन यांची जोड दिल्यास शेती व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळू शकते, असेही त्यांनी सांगितले. सध्या बाजारात विविध कंपन्यांच्या



नावाने भात बियाण्यांची विक्री मोठ्या प्रमाणात केली जात आहे. अनेक वेळा स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या भाताला आकर्षक पॅकिंग करून नवीन ब्रँडच्या नावाखाली शेतकऱ्यांना विकले जाते. दुकानदारांना अधिक नफा मिळत असल्याने कोणत्याही कंपनीचे बियाणे विकले जाते, मात्र त्याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसतो. नवीन बियाण्यांच्या मोहात पडून शेतकरी मोठ्या आशेने जास्त पैसे खर्च करतो, परंतु अपेक्षित उत्पादन न मिळाल्यास त्याची आर्थिक फसवणूक होते. ग्रामीण भागातील शेतकरी स्वभावाने साधा आणि प्रामाणिक असल्यामुळे तो वाद घालण्यापेक्षा परिस्थिती सहन करणे पसंत करतो. शेतीच्या कामात दिवसभर व्यस्त असणाऱ्या शेतकऱ्यांना न्यायासाठी धावपळ करणेही शक्य होत नाही. त्यामुळे अनेकदा त्यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष केले जाते.आज शेतीसमोरील सर्वात मोठी समस्या म्हणजे तरुण पिढीचे शेतीपासून दूर जाणे. गावातील अनेक तरुण रोजगारासाठी मुंबईसारख्या शहरांकडे वळत आहेत. दहा, वीस किंवा पन्नास हजारांच्या नोकरीसाठी गाव सोडून जाणाऱ्या तरुणांची संख्या वाढत आहे. रोजगार महत्त्वाचा असला तरी गावात आधुनिक विचारांचा, तंत्रज्ञान समजणारा आणि शेती व्यवस्थापन करू शकणारा तरुण शेतकरी कमी होत चालला आहे. त्यामुळे कोणते पीक घ्यावे, कोणत्या हंगामात लागवड करावी, खर्चाचे नियोजन कसे करावे आणि शेतीतून अधिक उत्पन्न कसे मिळवावे याचे गणित अनेक भागांत हरवत चालले आहे.

यूट्यूब माध्यमातून आधुनिक शेतीविषयक माहिती उपलब्ध असली तरी वयोवृद्ध शेतकऱ्यांना त्याचा पुरेसा उपयोग करून घेणे अवघड जाते. परिणामी अनेक ठिकाणी पारंपरिक पद्धतीची शेती सुरू असून त्यातून अत्यल्प नफा मिळतो, मात्र काही तरुण शेतकरी नोकरी सांभाळूनही शेतीत प्रयोग करत आहेत आणि आधुनिक पद्धतींचा अवलंब करून चांगले उत्पन्न मिळवत आहेत.

### दुखवटा

## हेमंत डोंबे

**कर्जत** : येथील दहिवलीत राहणारे उद्योजक आणि माजी नगरसेवक हेमंत तथा नंदू दत्तात्रेय डोंबे कुटुंबियांसमवेत केदारनाथ यात्रेसाठी गेले असता तेथे त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांचे तेथेच निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. श्री कपालेश्वर देवस्थान समितीचे ते अनेक वर्ष अध्यक्ष होते. महाराष्ट्र वीर शैव सभा रायगड जिल्हा अध्यक्षपदसुद्धा त्यांनी सांभाळले होते. त्यांच्या पश्चात पत्नी व एक कन्या असा परिवार आहे.



# खारघर स्टेशनमध्ये अल्पवयीन भिकाऱ्यांचा उच्छाद



**पनवेल : वार्ताहर**

हार्बर मार्गावरील खारघर रेल्वे स्थानकातून दररोज हजारो प्रवासी ये-जा करतात. मोठी रहदारी असलेल्या या परिसरात अल्पवयीन मुलांकडून भीक मागवण्याचे प्रकार वाढल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. स्थानकाबाहेरील खाद्यपदार्थांच्या स्टॉल परिसरात ही मुले दिवसभर फिरत असल्याचे दिसून येते.स्टॉलवर खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना नको त्या ठिकाणी स्पर्श करून पैसे मागणे, सतत मागे लागणे, त्रासदायक वर्तन करणे असे प्रकार सर्रास घडत आहेत.

यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. खारघर परिसरात अनेक शैक्षणिक संस्था व महाविद्यालये असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची वर्दळ असते, मात्र स्थानक परिसरातील वाढत्या भिकाऱ्यांच्या त्रासामुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वेळा अल्पवयीन मुलांना पुढे करून भीक मागवली जात असल्याचा आरोपदेखील स्थानिकांकडून होत आहे. स्थानिकांनी प्रशासन आणि रेल्वे पोलिसांनी गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. अल्पवयीन मुलांचा वापर करून भीक मागवणाऱ्या टोळ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्थानकात प्रवेशाच्या मुख्य मार्गात एका लहान बाळाला झोपवून त्याच्या नावाखाली भीक मागितली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तेच बाळ दिवसभर तिथे असते, मात्र भीक मागणाऱ्या महिला वेळोवेळी बदलत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले आहे. यामुळे संघटित पद्धतीने भीक मागवली जात असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# पं.स. सभापती, उपसभापतींचा मालडुंगे, वाजे परिसरात पाहणी दौरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मालडुंगे व वाजे ग्रामपंचायत क्षेत्रांतर्गत येणाऱ्या विविध गावांना पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर आणि उपसभापती भूपेंद्र पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली.

या दौऱ्यादरम्यान त्यांनी देहरंग, लहान धामणी, मोठी धामणी, बाबदेववाडी, वाघाची वाडी, धोदानी, टावरवाडी, सतीचीवाडी, तसेच वाजे ग्रामपंचायत क्षेत्रातील गाडेश्वर, चेरवली, वाजे व वाजेवाडी या गावांना भेट दिली. यावेळी ग्रामपंचायत कार्यालये, अंगणवाड्या आणि जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेतला.

या पाहणी दौऱ्यात कामांची गुणवत्ता तपासण्यासह स्थानिक नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यावर भर देण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, पंचायत समिती सदस्या वर्षा केवारे, तसेच पंचायत समितीचे पाणीपुरवठा अभियंता पूजा शेळके, रुजुता महाजन आणि बांधकाम अभियंता परविन काझमी, अंगणवाडी पर्यवेक्षिका ज्योती गांधी उपस्थित होते. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी संबंधित कामांच्या सद्यस्थितीची माहिती लोकप्रतिनिधींना दिली.

या दौऱ्यात मालडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सीताराम चौधरी, उपसरपंच जनार्दन निरगुडा, नेरे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष राजेश भोईर, विकास भगत, गणेश शिद, काळूराम निरगुडा तसेच वाजे ग्रामपंचायतीच्या प्रशासक भारती भालेकर, श्याम भालेकर, राजा शेठ भोईर, राजेश भालेकर, माजी उपसरपंच पदू वाघ, अंबाजी पाटील, रुपेश भोईर, गणेश पाटील, विष्णु सपरा, गणपत वारगडा यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकासकामे वेळेत आणि दर्जेदार पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी सभापती व उपसभापतींकडून देण्यात आल्या.

## निवडक

### खांदा कॉलनीतून इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून मित्राला भेटून येतो असे सांगून घराबाहेर पडलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अशोक अल्पेश भेंडखळे, वय ३६, रा. खांदा कॉलनी. उंची ५ फुट ३ इंच, रंग सावळा, शरीरबांधा मजबूत, चेहरा गोल, डोळे काळे, दाढी-मिशी थोडीशी वाढलेली, डोक्याचे केस समोरील बाजूस टक्कल पडलेले, मागील बाजूस काळे. अंगात चॉकलेटी रंगाचा प्लेन शर्ट व काळ्या रंगाची साधी पॅन्ट, पायात खाकी रंगाची सॅण्डल असे वर्णन आहे. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पो.ना. के.बी. भोई यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डिजिटल पेमेंट जागरूकता शिबिर

**नवीन पनवेल :** करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांच्या सहकार्याने डिजिटल पेमेंटबाबत जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन २९ आणि ३० मे रोजी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत करंजाडे येथे करण्यात आले आहे. यावेळी यूपीआयवर आयडी तयार करण्यासाठी आधार कार्ड आणि एटीएम कार्ड घेऊन येण्याचे आवाहन सरपंच मंगेश शेलार आणि उपसरपंच सागर आंग्रे यांनी केले आहे.

### आज दीक्षांत समारंभाचे आयोजन

**नवीन पनवेल :** पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीच्या तिसऱ्या दीक्षांत समारंभाचे आयोजन शुक्रवारी (दि. २९) करण्यात आले आहे. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रा. डॉ. शेखर मांडे आणि अजिताभ शर्मा (आयएएस) हेदेखील उपस्थित राहणार आहेत. यावेळी एक हजार २६८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान तसेच ३४ जणांना पीएचडी प्रदान करण्यात येणार आहे. उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांना ३७ सुवर्णपदके देऊन गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. केशव बडाया असणार आहेत.

# उरणमध्ये श्री पुरुषोत्तम याग उत्साहात; ब्राह्मण सभेकडून विशेष आयोजन



**उरण : वार्ताहर**

अधिक ज्येष्ठ पुरुषोत्तम मासानिमित्त गुरुवारी (दि. २८) लक्ष्मी नारायण मंदिरात ब्राह्मण सभा उरण यांच्या वतीने श्री पुरुषोत्तम यागाचे आयोजन करण्यात आले होते.

बुधवारी लक्ष्मी नारायण मंदिरातील गणेश, लक्ष्मी-नारायण मूर्तीवर अथर्वशीर्ष, पुरुष सूक्त व श्री सूक्त अभिषेकरूपी पठण करण्यात आले. यासाठी रायगड जिल्हाध्यक्ष शरद म्हसकर, त्यांचे सहकारी गिरीश पाटणकर आदी उपस्थित होते. यावेळी ब्राह्मण सभा उरणचे अध्यक्ष विराम उपाध्ये, उपाध्यक्ष प्रभाकर दाते, खजिनदार हेमंत धामणकर, सचिव वैभव राईलकर, विश्वस्त संजय दाते, धनंजय उपाध्ये, नरेंद्र उपाध्ये, नंदकुमार उपाध्ये, सचिन उपाध्ये, अथर्व उपाध्ये, मोहन त्याडी आदींचे सहकार्य लाभले.

# न्यू इंग्लिश स्कूलमध्ये 'ईट प्ले रीड'चा जागर



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

निरोगी आहार, खेळाचा आनंद आणि वाचनाची ओढ या त्रिसूत्रीद्वारे मुलांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'ईट प्ले रीड' या सामाजिक संस्थेमार्फत न्यू इंग्लिश स्कूल, गोविंदराव निकम येथे नुकतेच जनजागृती अभियान राबविण्यात आले. अपर्णा शहा यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दैनंदिन जीवनात सकस आहार, शारीरिक व्यायाम आणि वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी संस्थेच्या राजदूतांनी शाळेला भेट दिली.

यावेळी 'ईट प्ले रीड' टीमच्या वतीने विद्यार्थी, शिक्षकांसाठी एका विशेष सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले होते. संतुलित जीवनशैली कशी राखावी, सकस आहारामुळे शरीराला होणारे फायदे आणि वाचनामुळे विचारांमध्ये होणारा सकारात्मक बदल यावर मार्गदर्शन करण्यात आले. हा संदेश मुलांच्या मनावर बिंबावा यासाठी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना आकर्षक प्लेकार्ड्स व विशेषतः तयार केलेल्या डायऱ्यांचे वाटप करण्यात आले.

या साहित्यामुळे मुलांना त्यांच्या प्रगतीची आणि आरोग्याची नोंद ठेवण्यास मदत होणार आहे.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांची अनेकदा कमतरता भासते. हीच गरज ओळखून 'ईट प्ले रीड'ने या शाळेची निवड केली. संसाधनांची कमतरता असलेल्या भागातील मुलांपर्यंत पोहोचून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्थेने दाखवलेली ही वचनबद्धता कौतुकास्पद ठरत आहे.

अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या विधायक कार्याला समाजातून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे.

# विद्युत खांब बदलण्याची मागणी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेरे ते दुंद्रे भागात विद्युत पुरवठा कमी-जास्त दाबाने होत असून या ठिकाणी जीर्ण झालेले विद्युत खांब बदलून नवीन खांब बसवण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाचे पनवेल तालुका उपप्रमुख विश्वास पाटील आणि नेरे विभागप्रमुख विद्याधर चोरघे यांनी महावितरणकडे केली आहे.

नेरे ते दुंद्रे विभागात दररोज विद्युत पुरवठा खंडित होऊन कमी-जास्त दाबाने होत आहे. त्यामुळे विद्युतधारकांचे फॅन, टीव्ही, फ्रीज, वायफाय, बल्ब यांचे नुकसान होत आहे. तसेच मौजे शिवणसई तर्फे आंबे, आंबेवाडी या गावांमध्ये विजेची समस्या मोठ्या प्रमाणात आहे.

वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे आणि कमी-जास्त दाबाने होणे यामुळे नागरिक अक्षरशः वैतागले आहेत. या ठिकाणी एकच ट्रान्सफॉर्मर असल्याने त्यावर मोठ्या प्रमाणात लोड आहे. या ट्रान्सफॉर्मरवरून तामसई आणि वाजे गावाला विद्युत पुरवठा केला जातो. फार्म हाऊस चालकांनाही येथूनच विद्युत पुरवठा होत असल्याने इतरत्र होणारा विद्युत पुरवठा बंद करावा, जेणेकरून शिवणसई, आंबे, आंबेवाडी या गावांना सुरळीत विद्युत पुरवठा होईल. तसेच वाजे आणि तामसई गावासाठी वेगळ्या ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था करावी, अशी मागणी आहे.



**पनवेल :** येथील महापालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान, राष्ट्रभक्ती, सामाजिक सुधारणा आणि विचारांचा वारसा यांना यानिमित्ताने उजाळा देण्यात आला. यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, नगरसेविका स्नेहल ढमाले, उपायुक्त वैभव विधाते, स्वरूप खारगे, माहिती व जनसंपर्क अधिकारी नितीन साके, सामान्य प्रशासन विभागप्रमुख किर्ती महाजन तसेच अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# वाहतूक पोलिसांच्या निवारा केंद्रासाठी प्रेस क्लबचा पुढाकार



**पनवेल : प्रतिनिधी**

आजच्या धावपळीच्या युगात वाढणारी वाहनांची वर्दळ, होणारी ट्रॅफिक व त्यावर नियंत्रण करण्याकरिता वाहतूक पोलीस उन्हात पावसात रस्त्यावर कर्तव्य बजावत असतात, पण अशा पनवेल वाहतूक कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावत असताना नवीन पनवेल येथील एचडीएफसी चौकात निवारा केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी पनवेल महानगर प्रेस क्लबने पुढाकार घेतला असून याबाबत पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांची भेट घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी ते अथक परिश्रम करत असतात. सततच्या वाहनांचा गोंगाट आणि प्रदूषणात काम केल्यामुळे ते शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थकतात.

इतरांप्रमाणेच त्यांनाही कुटुंब असते आणि सण-उत्सवांच्या दिवशीही ते ड्युटीवर असल्यामुळे आपल्या कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्याशी सौजन्याने आणि आदराने बोलल्यास तेही नागरिकांना नक्कीच मदत करतात.

काही वेळा नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करणे हे त्यांच्या कर्तव्याचा भाग असतो. पनवेल महानगर प्रेस क्लब नेहमीच सामाजिक उपक्रम राबवित असते. त्याचाच एक भाग म्हणून वाहतूक पोलिसांसाठी निवारा केंद्र उभारण्यासाठी पनवेल महानगर प्रेस क्लबने पुढाकार घेतला असून लवकरच निवारा केंद्र उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन यावेळी पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी प्रेस क्लबच्या माध्यमातून पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना दिले असून यावेळी पनवेल महानगर प्रेस क्लबचे सदस्य व ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, सरचिटणीस राकेश पितळे, खजिनदार सचिन भोळे आणि इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



## संपादकीय

# शुद्धीकरण मोहिमेचे स्वागत!

सर्वोच्च न्यायालयाच्या निःसंदिग्ध निकालामुळे निवडणूक आयोगाला 'संविधानिक कवच' लाभले असून या मुद्द्यावरील राजकीय आणि सामाजिक संघर्षाला सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालाने पूर्णविराम दिला आहे. 'एसआयआर' मोहीम पूर्णपणे वैध असून ती लोकशाहीतील 'मुक्त आणि न्याय्य' निवडणुकांसाठी अनिवार्य असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

**केंद्रीय निवडणूक आयोगाने बिहार आणि अन्य राज्यांमध्ये केलेली मतदारयाद्यांची विशेष सखोल पडताळणी (एसआयार) मोहीम ही संपूर्ण कायदेशीर, वैध आणि आयोगाच्या कार्यपद्धतीशी सुसंगत अशीच प्रक्रिया असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने ताज्या निकालात दिल्यामुळे, विरोधकांकडून या मुद्द्यावर निर्माण केले गेलेले वाद पुरते निरर्थक ठरले आहेत. ही प्रक्रिया घटनात्मकदृष्ट्या वैध असून ती रद्द केली जाणार नाही किंवा मागे घेतली जाणार नाही असा स्पष्ट निर्णयही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे, ईव्हीएम किंवा व्हीव्हीपॅटच्या तांत्रिक वादाच्या पलीकडे जाऊन, प्रत्यक्ष मतदार यादीची शुद्धता आणि राष्ट्रीयत्व तपासणीशी संबंधित या मोहिमेवरून देशात आणि महाराष्ट्रात निर्माण झालेले राजकीय वादळ इतिहासजमा करावे लागेल. या मोहिमेवरील सर्व प्रश्नचिन्हे पुसली गेली आहेतच, उलट आता सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालानंतर या मोहिमेला अधिक कायदेशीर बळ मिळाले आहे. ज्या राज्यांमध्ये याआधी 'एसआयआर' अंतर्गत मतदार याद्यांची मोठ्या प्रमाणावर छाटणी झाली आणि त्यानंतर निवडणुका पार पडल्या, तेथील निकालांवर विरोधकांनी गंभीर शंका उपस्थित केल्या. मतदार याद्यांमधून विरोधी पक्षांच्या पारंपारिक मतदारांची, विशेषतः विशिष्ट समाजघटकांची नावे जाणीवपूर्वक आणि मोठ्या संख्येने गायब करण्यात आल्यामुळे निवडणुकीच्या निकालांवर थेट परिणाम झाला, असा आरोप विरोधकांकडून केला गेला. पश्चिम बंगालमधील २७ लाखांहून अधिक मतदारांची नावे वगळली जाण्याचा मुद्दा किंवा इतर राज्यांमधील दुबार नावांची छाटणीच्या मुद्द्यावर तीव्र आक्षेप घेऊन विरोधकांनी या प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच शंका उपस्थित केल्या होत्या. त्यांची ही अस्वस्थता केवळ पराभवाच्या भीतीमधून जन्माला आली होती, हे त्यानंतरच्या निकालांतून स्पष्ट झाले होते. आता मात्र, कोणाही घुसखोरास मतदान करता येणार नाही आणि कोणाही पात्र, व वैध मतदाराचा मतदाराचा हक्क डावलला जाणार नाही, याची ग्वाही देणारी ही प्रक्रिया निर्विरोधपणे पुढे सुरू राहील यात शंका नाही. मतदानाचा अधिकार अमूल्य असला तरी तो अनिर्बंधपणे राबविता येणार नाही हेदेखील न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्ट केले आहे. नागरिकत्व ठरविण्याचा किंवा नागरिकत्वाचा निर्वाळा देण्याचा अधिकार निवडणूक आयोगास नाही, पण नागरिकत्वाबाबतची शहानिशा करण्याचा आणि त्यासाठी मर्यादित स्वरूपात चौकशी करण्याचा आयोगाचा अधिकार न्यायालयाने स्वीकारला आहे. त्यातूनच या प्रक्रियेद्वारे निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुकांचा नवा मार्ग आता अधिक विस्तृत होणार आहे. मतदार यादीत नाव नसलेल व्यक्ती देशाचा नागरिक नाही असे नाही, पण देशाचा नागरिक नसलेली व्यक्ती मात्र, मतदारयादीत असणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी स्वीकारून पारदर्शक निवडणुकांचा नवा पायंडा पाडण्यासाठी आता जनतेने आणि विरोधकांनी सहकार्य करावे यातच लोकशाहीचे हित आहे. बोगस किंवा अवैध व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये आढळल्याने बिहार विधानसभा निवडणुकी दरम्यानच्या एसआयआर पडताळणी मोहिमेत उघड झाले होते. कोणीही यावे आणि भारतात घुसावे अशा मानसिकतेस आळा घालण्याची गरज आता अधिक ठळक झालेली असताना, आणि घुसखोरीला लगाम घालण्याची ठोस कृती सुरू झालेली असताना न्यायालयाच्या निर्णयामुळे पारदर्शकतेला बळ मिळेल यात शंका नाही.**


# रायगड जिल्ह्यातील रस्ते बनताहेत मृत्यूचे सापळे

### खबरबात
प्रकाश सोनवडेकर

काही दिवसांपूर्वी आंबेनळी घाटात झालेल्या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे रायगड जिल्ह्यात होणाऱ्या रस्ते अपघातांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. अपघात टाळण्यासाठी उपयायोजना सुचविल्या जात आहेत. हे काही दिवस चालेल. पुन्हा यरे माझ्या मागल्या. रायगड जिल्हा पोलीस पोलीस आधीक्षक कार्यक्षेत्राच्या हद्दीत जानेवारी ते एप्रिल २०२६ या चार महिन्यांच्या कालावधीत रस्त्यांवर २५४ अपघात झाले. या अपघातांमध्ये ९९ जणांचा मृत्यू झाला असून ३०५ जण जखमी झाले आहेत.

रायगड जिल्ह्यातून मुंबई–गोवा राष्ट्रीय माहामार्ग, मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई–पुणे महामार्ग तसेच अनेक राज्य महामार्ग जातात. दिवसेंदिवस रायगडातून होणारी वाहनांची वाहतूक वाढत आहे. त्यामुळे आपघातांची संख्यादेखील वाढत आहे. रस्ते अपघात कमी करण्यासाठी वाहतूक विभागामार्फत अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. चालकांनी वाहन सावकाश चालवावे यासाठी ठिकठिकाणी पोस्टर लावण्यात आले आहेत. प्रमुख नाक्यांवर वाहतूक पोलीस हे वाहनचालकांची तपासणी करतात. वाहनचालकांमध्ये जागृती करण्यात येत आहे. वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर धडक कारवाई हाती घेतली आहे. तरीदेखील मागील चार महिन्यात जिल्ह्यात २५४ अपघात झाले असून यामध्ये ९९ जणांचा मृत्यू झाला, ३०५ लोक जखमी झाले. त्यातील आनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. अपघातांची वाढणारी संख्या आणि त्यात होणारे मृत्यू ही चिंतेची बाब आहे.





मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर मागील चार महिन्यात ३५ अपघात झाले. त्यात नऊ जणांचा मृत्यू झाला. २१ जखमी झाले. मुंबई–पुणे जुन्या महामार्गावर ३० अपघात झाले. त्यात पाच जणांनी प्राण गमावले, ४१ जण जखमी झाले.



मुंबई–गोवा महामार्गावर झालेल्या ५१ अपघातात २६ जण मृत्युमुखी पडले, ७२ जखमी झाले. वडखळ–अलिबाग मार्गावर १४ अपघात झाले. त्यात सात जणांचा मृत्यू झाला, चार जखमी झाले. ताम्हिणी घाट–माणगाव–दिघी मार्गावर नऊ अपघातात झाले. त्यात पाच जण मृत्यूमुखी पडले, ६० जखमी झाले.

कर्जत–खोपोली–वाकण मार्गावर झालेल्या नऊ अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला, तर नऊ जण जखमी झाले. पेण–खोपोली मार्गावर चार अपघात झाले. त्यात दोन जण दगावले, तीन जण जखमी झाले.

अंतर्गत राज्यमार्गांवर झालेल्या ४६ आपघातात १९ जणांचा मृत्यू झाला, तर ५६ जण जखमी झाले. इतर मार्गांवर ५६ अपघात झाले. त्यात २३ जण मृत्युमुखी पडले, ३९ जण जखमी झाले. रायगड जिल्ह्यातील रस्ते मृत्यूचे सापळे बनले आहेत.

महामार्गांची संपूर्ण माहिती नसताना वेगाने वाहन चालविणे, रस्त्यावरील खड्डे चुकविण्याचा प्रयत्न करणे, कोणतीही पूर्वकल्पना न देता वाहन दुसऱ्या बाजूला नेणे, मद्य पिऊन वाहन चालविणे, धोकादायक वळणे, रस्त्यांवरील अवैध पार्किंग ही अपघातांची कारणे आहेत.

रायगड जिल्ह्यातील अपघातांच्या आकड्यांवर नजर फिरवली तर असे लक्षात येते की इतर महामार्गांपेक्षा मुंबई–गोवा माहामार्गावर सर्वाधिक अपघात झाले आहेत. मृत्यूंची संख्यादेखील जास्त आहे. याचे मुख्य कारण आहे रस्त्यांच्या दोन्ही बाजूला होणारी वाहनांची अवैध पार्किंग. केवळ मुंबई–गोवा महामार्गच नव्हे; तर सर्वच रस्त्यांवर होणारी अवैध पार्किंग ही समस्या गंभीर बनत चालली आहे. महामार्गालगत असलेली हॉटेल, धाबे आणि विश्रांतीस्थळांबाहेर ट्रक, डंपर, कंटेनर यांसारखी अवजड वाहने थेट रस्त्यावर उभी राहत असल्याने अपघात होत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी ही परिस्थिती अधिक गंभीर बनते. महाड–पोलादपूरदरम्यान अनेक ठिकाणी महामार्गाच्या कडेला तसेच सर्विस रोडवर अवजड वाहने उभी केली जात असल्याने इतर वाहनांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे.

अपघात झाल्यावर प्रशासन आणि वाहतूक पोलीस काही दिवस कारवाई करतात, मात्र पुन्हा मोठ्या प्रमाणात अवैध पार्किंग सुरू होते. धाबे आणि हॉटेल्ससमोर ट्रकच्या रांगा लागतात. त्यामुळे वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. अचानक समोर उभ्या असलेल्या वाहनांमुळे वेगात येणाऱ्या वाहनचालकांना अपघात टाळणे कठीण होते. सर्विस रोडवर उभी राहणारी ही अवजड वाहने स्थानिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहेत. अनेक गावांतील नागरिक रोजच्या प्रवासासाठी सर्विस रोडचा वापर करतात, मात्र रात्रीच्या वेळी ट्रकच्या रांगांमुळे रस्ता पूर्णपणे बंद झाल्यासारखी परिस्थिती निर्माण होते. वाहतूक पोलीस केवळ तात्पुरती कारवाई करतात, दंडात्मक मोहीम काही दिवस चालते आणि नंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे होते.

महामार्गावरील अवैध पार्किंगमुळे केवळ अपघातांचा धोका वाढत नाही, तर वाहतूक कोंडी, इंधनाचा अपव्यय आणि आपत्कालीन सेवांनाही अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे मार्गावरील अवैध पार्किंगवर कायमस्वरूपी नियंत्रण आणण्यासाठी विशेष मोहीम राबवयाला हवी. महामार्ग प्रशासन, वाहतूक पोलीस आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्त कारवाई करून सर्विस रोड मोकळे ठेवावेत, ढाब्यांसमोर अनधिकृत पार्किंग रोखावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई केली पाहिजे.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम आणि फेसबुकसाठी सब्सक्रिप्शन प्लॅन

व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, फेसबुकची पॅरेंट कंपनी असलेल्या मेटाने सब्सक्रिप्शनची घोषणा केली आहे. मेटाने वेगवेगळे प्लॅन आणले असून त्यामुळे सब्सक्रिप्शन घेणाऱ्यांना काही फीचर्स मिळणार आहेत.



मेटा आता या प्लॅटफॉर्म्सर्साठी प्लस व्हर्जन लॉन्च करणार आहे. यात पैसे देणाऱ्या वापरकर्त्यांना खास टूल्स आणि इतर फीचर्स दिले जाणार आहेत.

मेटा आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील जाहिरातीतून कमाई करते, पण कंपनीने आपले उत्पन्न वाढवण्यासाठी आता नवी योजना आणली आहे. मेटाला उत्पन्नासाठी केवळ जाहिराती अवलंबून राहायचे नाहीये. तुम्हाला या मीडिया प्लॅटफॉर्म्सवर प्रीमियम फीचर्स, चांगला अनुभव आणि चांगल्या दर्जाची माहिती हवी असल्यास सब्सक्रिप्शन घ्यावे लागणार आहे.

**कोणत्या प्लॅटफॉर्मसाठी किती रुपयांचे सब्सक्रिप्शन?**

मेटाने इन्स्टाग्राम प्लस आणि फेसबुक प्लससाठी सब्सक्रिप्शन प्लॅन ३.९९ डॉलर म्हणजे ३८७ रुपयांचा ठेवला आहे. त्याचबरोबर व्हाट्सॲपच्या प्लॅनची किंमत २.९९ डॉलर म्हणजे २९० रुपये इतकी आहे. मेटाने अजून भारतातील सब्सक्रिप्शन प्लॅन जाहीर केलेले नाहीत.

टेक क्रंचच्या एका रिपोर्टनुसार, व्हाट्सॲप प्लसचे सब्सक्रिप्शन घेणाऱ्यांना अनेक फीचर्स दिले जाणार आहेत. यात तुम्ही तुमच्या सोयीप्रमाणे मेसेजिंग सेटिंग करू शकणार आहात. त्याचबरोबर कस्टम थीम, युनिक रिंगटोन, प्रीमियम स्टिकर्स आणि जास्त चॅट्स पिन करण्याचे फीचर मिळणार आहे.

**फेसबुक, इन्स्टाग्राम प्लसमध्येही मिळणार विशेष फीचर्स**

इन्स्टाग्राम प्लस, फेसबुक प्लस सब्सक्रिप्शन घेतलेल्यांनाही कंपनी खास फीचर्स देणार आहेत. इन्स्टाग्राम प्लसमध्ये तुम्हाला तुमची स्टोरी किती परत बघितली गेली आहे, हे दिसणार आहे. त्याचबरोबर फ्रेंड्स फीचर पुढचे अनलिमिटेड स्टोरी ऑडियन्स लिस्टही बनवू शकणार आहेत.

इन्स्टाग्राम प्लसमध्ये २४ तासांपेक्षा अधिक काळ स्टोरी दाखवण्याची सुविधाही मिळणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक आठवड्याला एका स्टोरीला स्पॉटलाईट करता येईल. कोण स्टोरी बघत आहे, हे यूजर्स शोधू शकणार आहे. मेटाचे हे प्लॅन मेटा व्हेरिफाइडला लागू नाहीत, तर वेगळे आहेत.

# अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक पृथ्वीराज कपूर

### निमित्त



हिंदी चित्रपटसृष्टीतील 'मुघल–ए–आझम' म्हटल्या जाणाऱ्या अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचा आज स्मृतिदिन आहे. जगातल्या हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक नवा आयाम दिला आहे. त्यांनी आपल्या दमदार अभिनयाने त्याने सर्वांची मने जिंकली आहेत. पृथ्वीराज कपूर यांनी मूकपटांपासून आपल्या करिअरची सुरुवात केली आणि रंगीत चित्रपटांपर्यंतचा प्रवास केला. पृथ्वीराज कपूर यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९०६ रोजी पाकिस्तानातील समुद्री येथे झाला. लोक त्यांना 'बॉलीवूडचे ग्रँड फादर' म्हणतात. त्यांच्या वाढदिवसाच्या खास निमित्त त्यांच्याशी संबंधित रंजक किस्से जाणून घेऊया...

पृथ्वीराज कपूर यांनी लाहोरच्या एडवर्ड कॉलेजमधून ग्रॅज्युएशन पूर्ण केले. यानंतर त्यांनी नाटक आणि नाट्यक्षेत्रात काम करण्याचा विचार केला. पण जास्त शिकलेले असल्यामुळे त्यांना नाटकात काम मिळालं नाही. यानंतर ते १९२९मध्ये मुंबईत आले आणि इम्पीरियल फिल्म कंपनीत विनापगार अतिरिक्त कलाकार म्हणून काम करू लागले.

पृथ्वीराज कपूर यांनी वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी 'आलमआरा' या पहिल्या बोलक्या चित्रपटात तारुण्यापासून वृद्धापकाळापर्यंतची भूमिका साकारली होती. १९४१मध्ये आलेल्या 'सिकंदर'मध्ये त्यांनी सिकंदरची भूमिका केली होती. १९६०मध्ये 'मुघल–ए–आझम'ची भूमिका साकारून ते एक 'माईल स्टोन' बनले. 'आलमआरा'पूर्वी पृथ्वीराज कपूर यांनी नऊ मूकपटांमध्ये काम केले होते. १९२९मध्ये प्रदर्शित झालेला 'सिनेमा गर्ल' हा मुख्य अभिनेता म्हणून त्यांचा पहिला चित्रपट होता. या चित्रपटासाठी त्यांना ७० रुपये मानधन मिळाले होते.

१९६०मध्ये त्यांनी 'मुघल–ए–आझम' या चित्रपटामध्ये अकबराची भूमिका साकारली होती. हे पात्र त्यांच्या करिअरसाठी मैलाचा दगड ठरले. त्यांचा जबरदस्त अभिनय आजही लोकांच्या स्मरणात आहे. या चित्रपटात दिलीप कुमार, मधुबाला, दुर्गा खोटे आणि निगार सुलतान यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटाने अनेक विक्रम मोडले. चित्रपटाची रंगीत आवृत्ती २००४ साली प्रदर्शित झाली होती.

पृथ्वीराज कपूर यांनी १९४४मध्ये पृथ्वी थिएटर्सची स्थापना केली. हे थिएटर देशभर गाजले होते. १६ वर्षांच्या प्रवासात त्यांनी जवळपास २६६२ नाटके सादर केली होती. आजकाल या थिएटरची देखभाल शशी कपूर यांची मुलगी संजना करत आहे. बॉलिवूडमधील कपूर कुटुंबाची गणना प्रसिद्ध कुटुंबांमध्ये केली जाते. शशी कपूर, शम्मी कपूर, ऋषी कपूर, राज कपूर, रणबीर, करीना, करिश्मा कपूर असे अनेक स्टार्स या घराण्यातून बॉलीवूडला मिळाले आहेत.

पृथ्वीराज कपूर यांचा शेवटचा चित्रपट 'आवारा', 'कल आज और कल' ज्यामध्ये कपूर कुटुंबातील तीन पिढ्यांनी काम केले. २९ मे १९७१ रोजी पृथ्वीराज कपूर यांनी या जगाचा कायमचा निरोप घेतला.

पृथ्वीराज कपूर यांना १९६९ साली कला क्षेत्रात पद्मभूषण देऊन भारत सरकारने सन्मानित केले होते. १९७२मध्ये त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारही मिळाला. १९५४ मध्ये पृथ्वीराज कपूर यांना संगीत नाटक अकादमी फेलोशिप देण्यात आली. भारतीय सिनेमात त्यांची सर्वाधिक प्रशंसा झाली. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# एसी खोलीतून थेट उन्हात गेल्यावर नेमकं काय होतं?

उन्हाळ्यात एसीने जो काही दिलासा मिळतो त्याला काही तोड नसते, पण दिवसभर गारेगार एसीत बसून राहण्याचे शरीरावर काही दुष्परिणामसुद्धा होतात. बरेच लोक थेट उन्हातून एसीमध्ये जातात किंवा एसीमधून बाहेर उन्हात जातात, मात्र पण असं करणं तब्येतीसाठी घातक ठरू शकतं.



जेव्हा एसीमध्ये बसलेलो असतो, तेव्हा शरीराचं तापमान थंड असतं. एसी रूममध्ये १८ ते २५ डिग्रीदरम्यान तापमान असतं, तेच बाहेरचं तापमान ४० ते ४५ डिग्री इतकं असतं. अशात एसीतून लगेच बाहेर गेलात तर शरीराला अचानक तापमानाच्या मोठ्या अंतराचा सामना करावा लागतो, ज्यामुळे शरीराच्या टेम्प्रेचर रेगुलेशन सिस्टम प्रभावित होतं.

**आरोग्यावर काय होतो परिणाम?**

झटक्या येण्याचा धोका – तापमानात अचानक बदल झाल्याने शरीरात झटक्याची स्थिती निर्माण होऊ शकते. अशात चक्कर येणे, बेशुद्ध पडणे किंवा हार्ट ॲटॅकसारखी गंभीर स्थितीही होऊ शकते.

डोकेदुखी आणि मायग्रेन – एसीतून निघून थेट उन्हात गेल्यावर डोकेदुखी आणि मायग्रेनची समस्या वाढू शकते. तापमानात अचानक बदलाचा न्यूरोलॉजिकल प्रभाव पडू शकतो.

श्वसनास त्रास – एसी रूममध्ये अचानक गरम हवेत गेल्यास श्वसन तंत्र प्रभावित होऊ शकतं. ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास, खोकला, अस्थमा ॲटॅकचा धोका असतो.

त्वचेवर प्रभाव – एसीमध्ये राहिल्याने त्वचा कोरडी होते, त्वचेतील ओलावा कमी होतो. अशात जर थेट उन्हात गेल्यास त्वचा भाजू शकते आणि सनबर्न होऊ सकते.

**बचावासाठी काय उपाय कराल?**

– एसी रूममध्ये बाहेर जाण्याआधी काही वेळ सामान्य तापमानात शरीर नॉर्मल करा. जसे की, एसी बंद करा किंवा एसी नसलेल्या जागेवर काही मिनिटं थांबा.

– सकाळी आणि सायंकाळी ऊन कमी असतं, त्यामुळे यावेळी बाहेर पडणं सुरक्षित राहतं.

– हलके आणि सैल कपडे वापरा, या कपड्यांनी उन्हापासून बचाव होतो आणि घाम लवकर सुकतो.

– दिवसभर भरपूर पाणी प्या, जेणेकरून शरीर हायड्रेट राहील आणि डिहायड्रेशनचा धोकाही कमी होतो.

– बाहेर पडताना हाय एसपीएफ असलेल्या सनस्क्रीनचा वापर करा. सूर्याच्या घातक किरणांपासून याने बचाव होतो आणि टॅनिंगचा धोकाही टाळता येतो.

# १ जूनपासून रायगड जिल्ह्यात समुद्रातील मासेमारीला बंदी

## ◆ पारंपरिक नौकांना सवलत, यांत्रिक नौकांना 'ब्रेक'



**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्ह्यातील समुद्रातील मासळीच्या साठ्याचे जतन करण्यासाठी आणि पावसाळ्यातील वादळी हवामानापासून मच्छीमारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी शासनाने यंदा १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत पावसाळी मासेमारीवर अधिकृत बंदी जाहीर केली आहे. रायगड जिल्ह्याचे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) संजय पाटील यांनी यासंदर्भातील अधिकृत माहिती दिली.

या दोन महिन्यांच्या कालावधीत समुद्रातील माशांचा प्रजोत्पादन काळ असतो. त्यामुळे या बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेला मोठा वाव मिळून समुद्रातील मासळीचा साठा वाढण्यास मदत होते. यांत्रिक नौकांना बंदी, पारंपरिक नौकांना सूट मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या आदेशानुसार ही पावसाळी मासेमारी बंदी सर्व प्रकारच्या यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांना पूर्णपणे लागू राहील, मात्र पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यांत्रिक नौकांना या बंदीतून सवलत देण्यात आली आहे. सध्या समुद्रात गेलेल्या सर्व यांत्रिक नौकांनी ३१ मेपूर्वीच आपापल्या बंदरांमध्ये परतणे बंधनकारक करण्यात आले असून, १ जून किंवा त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बंदरांवर मासे उतरवण्यास परवानगी दिली जाणार नाही. १२ सागरी मैलांपर्यंतच्या क्षेत्राबाहेर खोल समुद्रात जाणाऱ्या नौकांना केंद्र शासनाचे धोरण व मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन सर्व मच्छीमार सहकारी संस्थांना करण्यात आले. बंदीच्या काळात कोणतीही यांत्रिक नौका बेकायदेशीरपणे मासेमारी करताना आढळली, तर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमान्वये ती नौका, त्यावरील उपसाधने, पकडलेली मासळी जप्त करून संबंधित मालकावर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. बंदीच्या काळात समुद्रात जाऊन अपघात झाल्यास अशा नौकेला शासनाकडून कोणतीही आर्थिक नुकसान भरपाई मिळणार नाही, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व नौकामालकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात आले आहे.

# रोह्यात बकरी ईद उत्साहात साजरी; सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन

**रोहा : प्रतिनिधी**

इस्लाम धर्मात शेवटचा महिना म्हणजे जुल हिज्जा होय. या महिन्यात जगभरातील करोडो मुस्लिम समाज बांधव व भगिनी सौदी अरेबिया येथील मक्का मदिना या पवित्र भूमीत हज यात्रे साठी रवाना होतात.महिन्याच्या नव्या दिवशी येथील अराफात मैदानातील विधी पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी जगभरात बकरी ईद साजरी करण्याची प्रथा आहे. या अनुषंगाने रोहे तालुक्यासहित संपूर्ण रायगड जिल्ह्यातील मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद मोठ्या उत्साहात, शांततेत आणि पारंपारिक पद्धतीने साजरी केली.

बुधवारी एकदिवसीय उपवास केल्यानंतर गुरुवारी पहाटे ईदची सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर मौलवी यांनी खूतबा पठण केल्यानंतर संपूर्ण भारतदेशात शांतता नांदावी. तसेच बंधूभाव व एकोपा कायम राहावे यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.त्यानंतर एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

ईदच्या पार्श्वभूमीवर सणाला गालबोट लागू नये म्हणून सर्वत्र मशिदी बाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले होते. ईदच्या अनुषंगाने पोलिस प्रशासना कडून काही नियम लागू करण्यात आले होते.या नियमांचे मुस्लिम बांधवांकडून काठेखोरपणे पालन करण्यात आले.

रोहा शहरातील जामे मस्जिद, सलमान फारसी मस्जिद, अबू बकर मस्जिद, सफा-मरवाह मस्जिद, अप्पर मोहल्ला मस्जिद आणि अष्टमी जामे मस्जिद त्याचप्रमाणे तालुक्यातील न्हावे, सूडकोली,खैरे खुर्द, चांडगाव,कोलाड, नागोठणे आदी ठिकाणी असलेल्या मशिदीत सामूहिक नमाज अदा करून ईद साजरी करण्यात आली. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील पोलादपूर, महाड, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, मुरूड, अलिबाग, पेण, पाली - सुधागड, कर्जत, खालापूर, पनवेल, उरण तालुक्यात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी केली.

दरम्यान, यंदा सौदी अरेबिया येथील मक्का मदिना येथे हजसाठी देशभरातून दीड लाखांहून अधिक भाविक गेले आहेत.



# मुरूड-जंजिरा नगर परिषद हद्दीत घरगणना अंतिम टप्प्यात

**मुरुड : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या जनगणना २०२७ अभियानांतर्गत मुरुड-जंजिरा नगर परिषद हद्दीत घरगणनेचे काम १६ मेपासून सुरू असून १४ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. सध्या हे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन नगर परिषदेने केले आहे. मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली घरगणनेचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या मोहिमेसाठी जनगणना विभागामार्फत विशेष नियोजन करण्यात आले असून शहरातील प्रत्येक घर, कुटुंब व इमारतींची माहिती संकलित केली जात आहे.

या कामासाठी अनिकेत भोसले व जनगणना लिपीक सुदेश माळी यांच्या समन्वयातून एकूण २० प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली. पर्यवेक्षणासाठी आशितोष पाटील, सतेज निमकर, राजेश भोईर, जयकृष्ण भिसे यांची नियुक्ती करण्यात आली. घरगणनेदरम्यान प्रत्येक घरातील सदस्य संख्या, घराची स्थिती, उपलब्ध मूलभूत सुविधा, इमारतींचा प्रकार, पिण्याचे पाणी, स्वच्छता यासह विविध बाबींची माहिती संकलित केली जात आहे. ही माहिती भविष्यातील शासकीय योजना, नागरी सुविधा, विकास आराखडे तसेच विविध कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. प्रगणक आणि पर्यवेक्षक घरभेटीदरम्यान भेट देत असताना त्यांना अचूक आणि आवश्यक ती माहिती द्यावी.



# महाड नगर परिषदेच्या घनकचरा डेपोला भीषण आग; संपूर्ण कचरा जळून खाक

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपरिषदेच्या लाडवली गावाच्या हद्दीतील घनकचरा प्रकल्पाच्या कचरा डेपोला बुधवारी (दि. २७) सकाळी भीषण आग लागली. या आगीत डेपोमधील मोठ्या प्रमाणावरील कचरा जळून खाक झाला असून परिसरात धुराचे प्रचंड लोट पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच महाड नगर परिषदेची अग्निशमन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली आणि आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले.



यावेळी मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, अभियंता रोहित भोईर, नगरसेवक प्रमोद महाडिक तसेच अन्य कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते. प्राथमिक माहितीनुसार शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज आहे. घटनास्थळी विद्युत खांबावरील वाहक तार खाली पडल्याचे निदर्शनास आले असून, त्यातूनच आगीची ठिणगी पडून कचऱ्याने पेट घेतल्याची शक्यता आहे. प्रकल्पाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक व सुका कचरा साठवला होता. शेडखाली ओला कचरा आणि मोकळ्या जागेत सुका कचरा असल्याने आग वेगाने भडकली. घनकचरा प्रकल्पाच्या उभारणीवेळी विद्युत वाहक तारांपासून सुरक्षित अंतर राखणे आवश्यक असताना गोदाम व मोकळ्या जागेतील सुका कचरा वीज वाहक तारेच्या परिसरात असल्याचे समोर आले आहे.

# गंगासागर तलाव स्वच्छतेसाठी श्रमदान; स्टॉलधारक, व्यावसायिकांसह स्थानिकांचा पुढाकार

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर किल्ले रायगडावरील ऐतिहासिक गंगासागर तलावाच्या स्वच्छतेसाठी स्थानिकांनी मोठा पुढाकार घेतला आहे. बुधवारी (दि. २७) गाईड संघटना, महिला संघटना तसेच ताक व स्टॉल विक्रेता संघटनांच्या सुमारे १५० सदस्यांनी श्रमदान करत तलावातील गाळ काढण्याच्या



कामास सुरुवात केली.

सध्या किल्ले रायगडावर पाण्याची कमतरता जाणवत असून गंगासागर तलाव पूर्णपणे आटला आहे. तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाणीसाठ्याची क्षमता कमी झाली आहे. येत्या ६ जून रोजी तारखेप्रमाणे आणि २७ जून रोजी तिथीनुसार होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी लाखो शिवभक्त रायगडावर दाखल होणार आहेत. या काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी ही स्वच्छता मोहीम राबवण्यात येत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या उपक्रमात ताक विक्रेते आणि स्टॉलधारक महिलांचा मोठा सहभाग दिसून आला. महिलांनी भावना व्यक्त करताना सांगितले, "रायगड ही आमची उपजीविका आहे आणि गड स्वच्छ ठेवणे हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही आठवड्यातून एकदा गडावर स्वच्छता करतोच. मात्र, आज सर्वांनी एकत्र येऊन गंगासागर तलावाच्या स्वच्छतेची मोठी मोहीम हाती घेतली असून तलाव पूर्णपणे स्वच्छ करण्याचा आमचा निर्धार आहे.

# आंतरराष्ट्रीय डान्स चॅम्पियशिपमध्ये श्रीजा पाटीलची सुवर्णभरारी



**पाली : प्रतिनिधी**

नेपाळमधील काठमांडू येथे पार पडलेल्या 'आंतरराष्ट्रीय डान्स स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२६' मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना पाली-सुधागडच्या श्रीजा संदेश पाटील हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि मानाचे सुवर्णपदक आपल्या नावावर केले. या जागतिक स्तरावरील देदीप्यमान यशाबद्दल श्रीजाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

नुकतेच पाली-सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार यांच्या हस्ते तिचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले. काठमांडू येथील राष्ट्रीय नाचघर, जमाल येथे रविवारी (दि. २४) ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा पार पडली. 'साऊथ एशियन



फेडरेशन फॉर ऑल स्पोर्ट्स' आणि 'वर्ल्ड अमेच्युअर स्पोर्ट्स कौन्सिल' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत विविध देशांतील कसलेल्या नृत्यांगनांनी सहभाग घेतला होता.

या कडव्या स्पर्धेत श्रीजाने आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या नृत्याविष्काराने आणि उत्कृष्ट सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली व आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर तिरंगा अभिमानाने फडकवला.

# पक्ष्यांसाठी पाणवठे, गच्चीवर पाणी ठेवण्याचे पक्षीप्रेमींकडून आवाहन

**मुरुड : प्रतिनिधी**

मे महिना सुरुवात होताच वातावरणामध्ये दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत चालले असून मुरुड तालुक्यातील बहुसंख्य गावात दुपारी १२ नंतर ३८ डिग्री सेल्सियस तापमान असल्याने कडक अशा उन्हाळ्याच्या झळा मानवा प्रमाणे पशू पक्षी व वन्यजीव यांना सहन करावी लागत आहे. माणसाप्रमाणेच पक्ष्यांनाही मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे.

अशा उष्ण तापमानात विहार करताना पक्ष्यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. पक्ष्यांना डिहायड्रेशन होऊन पक्षी जमिनीवर खाली पडतात. यात त्यांना स्वतःचा जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे पक्ष्यांचे संरक्षण होण्यासाठी प्रत्येक ठिकाणी पाणवठे तसेच आपल्या पारस बागेत अथवा गच्चीवर पक्षांच्या पाण्याची सोय करण्यासाठी घरातील कोणतेही भांडे पाण्याने तुडूंब भरून ठेवावे जेणेकरून पक्षांच्या पाण्याची सोय होऊन त्याचा जीव वाचवणे शक्य होणार आहे.यासाठी प्रत्येक पक्षी प्रेमी यांनी स्वतः पुढाकार घेऊन पक्ष्यांच्या पाण्याची सोय उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन पक्षीप्रेमी संघटनेकडून करण्यात आले आहे.

मुरुड तालुक्यात सुपेगाव भागात सुप्रसिद्ध असे फणसाड अभयारण्य आहे.येथे पक्षांच्या विविध अशा १३० जाती आढळून आलेल्या आहेत.पक्षी हे सर्वत्र विहार करीत असतात.मे महिन्यात वाहते नाले व धरणातील पाणी सुधा सुकून गेलेले असते अश्यावेळी पक्षांना पाणी मिळणे दुरापास्त होत आहे.तेव्हा प्रत्येक नागरिकांनी सजगता व आपले पक्षी कर्तव्य म्हणून पक्षांना पाणी उपलब्ध करून देण्याचे सांगण्यात आले आहे.

शहरी भागात पक्ष्यांची अन्नसाखळी तुटल्यामुळे अन्नाच्या शोधात पक्षी दूर अंतरावर उडत जातात. त्यामुळे त्यांना पाण्याची गरज भासत असते.

येत्या काही दिवसात उन्हाचा पारा अधिक वाढणार असल्याने पक्ष्यांसाठी शहरी भागात अथवा ग्रामीण भागात घराच्या बाजूला पाणवठे अथवा बागेत,नारळ सुपारी बागेत, शेत जमिनीत पक्षांना पाणी मिळेल अशी व्यवस्था करावी जेणे करून पक्षांचा जीव वाचवता येणार आहे.

याबाबत पक्षी प्रेमी संदीप घरत यांनी सांगितले की,प्रचंड उष्णता वाढली की माणसाप्रमाणे पक्षांना सुधा मोठा त्रास सहन करावा लागत असतो.पाण्याचे सर्व स्तोत्र आटल्याने पक्ष्यांना पाणी मिळत नाही. अशा वेळी मानवाने पक्ष्यांवर दया करून आपल्या गच्चीवरील मोकळ्या जागेत संपूर्ण भांडे पाण्याची भरून ठेवावीत. तसेच शेतीचे रानमाळ, बागायत जमीन अशा ठिकाणी कोणतेही भांडे पाण्याने तुडूंब भरून ठेवावीत जेणेकरून परिसरातील पक्ष्यांना पाणी मिळू शकेल.





मुरुड : बकरी ईदनिमित्ताने मुरुडच्या नवाबकालीन ईदगाहवर मुस्लीम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. (छाया : सुधीर नाझरे)

# आदर्श आचारसंहितेमुळे १ जूनचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन रद्द

**अलिबाग : प्रतिनिधी**

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र. प्रसुधा २०११/ प्र.क्र.१८९/११/१८-अ, दि.२६ सप्टेंबर २०१२ अन्वये प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

दरम्यान, मा.मुख्य निवडणूक अधिकारी, कार्यालयाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. हा निवडणूक कालावधी दि.२५ मे २०२६ ते दि.२५ जून २०२६ असा असून, संबंधित मतदारसंघात दि.२५ मे २०२६ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

यामुळे शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.५.७ मधील तरतुदीनुसार सोमवार, दि.१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन रद्द करण्यात आला आहे. याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# लघुउद्योजक संघटनेला सर्वोच्च दणका!

## टीटीसी एमआयडीसी क्षेत्रातील मालमत्ता कर वसुलीचा नवी मुंबई पालिकेचा अधिकार आबाधित



**नवी मुंबई : बातमीदार**

सर्वोच्च न्यायालयात २०१० पासून सुरू असलेल्या नवी मुंबई टीटीसी एमआयडीसी क्षेत्रातील लघुउद्योजक संघटनेच्या न्यायालयीन प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असून नवी मुंबई महानगरपालिका टीटीसी एमआयडीसी क्षेत्रातील मालमत्ताकर वसुलीसाठी सक्षम प्राधिकरण असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे इतक्या वर्षांपासून प्रलंबित असलेला या क्षेत्रातील मालमत्ताकर वसुलीचा प्रश्न मार्गी लागला आहे.

त्याचप्रमाणे कर आणि शुल्क या बाबी वेगवेगळ्या असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले असून त्यामुळे 'डबल टॅक्स' आकारला जात नाही हेदेखील स्पष्ट झाले आहे. सदर न्यायालयीन प्रकरणात स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनमार्फत टीटीसी एमआयडीसी क्षेत्र हे नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली येते काय, असा दावा करण्यात आला होता. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ यामधील तरतुदींच्या आधारे हे संपूर्ण क्षेत्र नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली येते हे स्पष्ट केले. टीटीसी एमआयडीसी क्षेत्रासाठी नवी मुंबई महानगरपालिकेला कर लावता येतो काय, याविषयी निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने कर व शुल्क या दोन्ही बाबी भिन्न असून कर लावण्याचे सार्वभौम अधिकार हे स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महानगरपालिकेचे आहेत, हे नमूद केले आहे.

शुल्क हे वापरलेल्या सेवांसाठीचा अधिभार अथवा मोबदला म्हणून आकारण्यात येते. त्याचा करामध्ये समावेश होत नाही हेदेखील सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे एमआयडीसी केवळ शुल्क आकारू शकते, कर नाही हे नमूद करीत सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ व १२८ अ नुसार टीटीसी एमआयडीसी क्षेत्रात कर आकारण्याचा अधिकार नवी मुंबई महानगरपालिकेचा आहे हेदेखील स्पष्ट केले आहे. अशा रीतीने सर्वोच्च न्यायालयाने या दोन्ही बाजूंवर स्पष्टता दिली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे या क्षेत्रासाठी कर आकारण्याचे अधिकार निश्चित करतानाच कर आणि शुल्क यामधील फरक सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्याने 'डबल टॅक्स' आकारला जातो हे विधान अयोग्य असल्याचे सिद्ध झाले आहे.

**लघुउद्योजकांनी करभरणा करून शहर विकासाला हातभार लावावा**

न्यायालयात प्रलंबित टीटीसी एमआयडीसी क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीचा विषय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार निकाली निघाला असून महानगरपालिकेचा करवसुलीचा मार्ग मोकळा झाला. या माध्यमातून पालिकेस मिळणारा महसूल शहर विकासाला नवी गती देणारा असल्याचे मत व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा आदर करीत सर्व लघुउद्योजकांनी मालमत्ता कर भरून शहर विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन केले आहे.

# बेलापूर विभागात अतिक्रमण विभागाची धडक कारवाई

## ४८ अनधिकृत झोपड्या जमीनदोस्त



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे, उपआयुक्त संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बेलापूर विभाग कार्यक्षेत्रात अनधिकृत झोपड्यांवर अतिक्रमण विभागाने धडक कारवाई केली. बेलापूर 'अ' विभाग कार्यालयामार्फत विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोरील सिडकोच्या भूखंडावरील नेरूळ सेक्टर-३० येथील २२, आग्रोळी गाव पुलाखालील १८ तसेच इनकम टॅक्स कॉलनी, बेलापूर येथील आठ अशा एकूण ४८ अनधिकृत झोपड्या हटवण्यात आल्या.

स्वतःहून न हटविल्याने ही कारवाई करण्यात आली. यासोबतच दिवाळे गाव, नवी मुंबई येथील तीन बेवारस पडिक रिक्षा जप्त करण्यात आल्या. मोहिमेत बेलापूर विभागाचे सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी प्रशांत नेरकर, विभाग कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यासाठी १५ मजूर, एक जेसीबी व साधनसामग्री वापरण्यात आली. अतिक्रमण विभागातील पोलीस अधिकारी, कर्मचारी, सुरक्षारक्षकही तैनात होते. यापुढेही कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# शिरवणे गावात बेकायदा दारूविक्री

## कारवाईची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे गावात खुलेआम बेकायदा दारूविक्री करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याची मागणी शिवसेनेचे माजी नगरसेवक ज्ञानेश्वर सुतार यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र राज्यात विनापरवाना देशी-विदेशी दारू विक्री करणे कायद्यानुसार गंभीर गुन्हा असून, या गुन्ह्यासाठी कठोर दंडात्मक कारवाई आणि तुरुंगवासाची तरतूद आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे बनविण्यात आलेल्या नियमांनुसार देशी-विदेशी दारू विक्री करण्यासाठी योग्य परवाना असणे अनिवार्य आहे, मात्र देशी-विदेशी दारू विक्रीबाबत कठोर शासकीय नियम असूनही गेल्या अनेक वर्षांपासून शिरवणे गावात खुलेआम अनधिकृतपणे देशी-विदेशी दारू विक्रीचा धंदा चालू आहे. खुलेआम दारू विक्रीमुळे शिरवणे गावातील तरुण पिढी कमी वयात वाईट मार्गावर जात असून, आईवडिलांना मुलांचे भविष्य आता अंधारात दिसत आहे.

दरम्यान, अनेक वेळा शिरवणे गावात सुरू असलेल्या खुलेआम दारू विक्रीमुळे रात्री-अपरात्री बेधुंद अवस्थेतील तरुणांमध्ये मारामारी होण्याच्या घटनादेखील वारंवार येथे घडत आहेत. त्यामुळे शिरवणे गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, असे माजी नगरसेवक ज्ञानेश्वर सुतार यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांना दिलेल्या निवेदनात अधोरेखित केले आहे.

# सानपाडा-चाकण मार्गावर एसी एसटी बससेवेची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडासह नवी मुंबईतील नागरिकांच्या सुलभ आणि सुरक्षित प्रवासासाठी एसटी महामंडळाने वातानुकूलित बससेवा सुरू करावी, अशी मागणी नगरसेवक सुनील कुरकुटे यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे केली आहे. मुंबई, नवी मुंबई, चाकण, मंचर, खेड, नारायणगाव तसेच आळेफाटा परिसरातील नागरिकांच्या वाढत्या प्रवासी गरजा लक्षात घेता मुंबई सेंट्रल-नवी मुंबई-चाकण मार्गे आळेफाटा या मार्गावर वातानुकूलित एसटी बससेवा तातडीने सुरू करण्यात यावी, असे कुरकुटे यांनी म्हटले आहे.

या मार्गावर मोठ्या प्रमाणावर कामगार, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच ज्येष्ठ नागरिक नियमित प्रवास करत असतात. विशेषतः नवी मुंबई व चाकण या औद्योगिक क्षेत्रांमध्ये रोजगारासाठी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने सार्वजनिक वाहतुकीची गरज अधिक तीव्र झाली आहे. सध्या या मार्गावर थेट, सुरक्षित, आरामदायी आणि वातानुकूलित सार्वजनिक प्रवासाची सुविधा अत्यंत मर्यादित असल्याने प्रवाशांना खासगी वाहनांचा किंवा महागड्या खासगी प्रवासी सेवांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या खर्चात वाढ होत असून वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाच्या समस्येतही भर पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ही बससेवा सुरू झाल्यास हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. नवी मुंबई, चाकण व आळेफाटा परिसरातील नागरिकांना सुरक्षित व आरामदायी प्रवास सुविधा उपलब्ध होईल. कामगार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांचा प्रवास वेळ आणि खर्च कमी होण्यास मदत होईल. तसेच खासगी वाहनांचा वापर कमी झाल्याने वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करण्यास हातभार लागेल. याशिवाय महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नात वाढीची शक्यता असून महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी अधिक सोयीस्कर व सुरक्षित प्रवास व्यवस्था निर्माण होईल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे.

# महिलेचे मंगळसूत्र खेचले

**पनवेल : प्रतिनिधी**

मोटरसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी एका महिलेच्या गळ्यातील १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून पळ काढल्याची घटना येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी बुधवारी (दि. २७) खारघर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार वर्षा गुरव आणि त्यांची मुलगी राशी गुरव या 'पापाजी दा ढाबा' येथून फेरफटका मारण्यासाठी पायी चालत जात होत्या. दरम्यान, याचवेळी मोटरसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने खेचले आणि ते पळून गेले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## शुभेच्छा!



**उरण : आदिवासी बांधवांकरिता अहोरात्र झटणारे युवा डॉक्टर तेजस बाबर यांना आमदार महेश बालदी यांनी वाढदिवसानिमित्त तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# स्कुटी आडवी लावून मारहाण; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल : प्रतिनिधी**

३८ वर्षीय इसमाच्या स्कुटीला गाडी आडवी लावून मारहाण तसेच नागरिकांवर दगडफेक करून भीती दाखवली व स्कुटीवरून पळून गेल्याप्रकरणी तकदीर आणि त्याच्यासोबत असलेल्या दोन इसमांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात बुधवारी (दि. २७) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश ज्ञानेश्वर गवस हे कोनगाव येथे राहत असून २७ मे रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास डी मार्टच्या अलीकडे भारत बेंझ शोरूमसमोर, पळस्पे फाटा येथील रस्त्यावर तकदीर आणि त्याच्या दोन साथीदारांनी त्यांची स्कुटी गणेश याच्या स्कुटीला आडवी लावली. त्याला मारहाण करून हाताला चावा घेतला व त्याच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी आणि पेंडंट जबरदस्तीने खेचून घेऊन जाऊ लागले. यावेळी सोडवण्यास आलेल्या नागरिकांवर दगडफेक करून त्यांनी भीती दाखवली आणि पनवेलच्या दिशेने ते स्कुटीवरून निघून गेले.

# उरणची मासेमारी : परंपरा आणि आधुनिकतेचा अद्भुत संगम



उरण तालुका हा समुद्रकिनाऱ्याने वेढलेला आहे. करंजा, मोरा, न्हावा, शेवा, बोकडविरा, पुनाडे येथील कोळी बांधवांची मासेमारी हीच मुख्य उपजीविका आहे. पापलेट, सुरमई, हलवा, रावस, कोळंबी, बांगडा, बोंबील यांसारखे मासे येथे मोठ्या प्रमाणात मिळतात. उरणचा बोंबील आणि सुकट तर जगप्रसिद्ध आहे. होडीपासून पर्ससीन बोटींपर्यंत बदल पूर्वी मच्छीमार छोट्या होड्या घेऊन समुद्रात जात. आता काळ बदलला आहे. शासनाच्या अनुदानातून अनेकांनी आधुनिक पर्ससीन बोटी, ट्रॉलर घेतले आहेत. जीपीएस, इको-साउंडर, वॉकी-टॉकी यांसारख्या उपकरणांमुळे खोल समुद्रात जाणे, मासे शोधणे सोपे झाले आहे.

जेएनपीटीमुळे डिझेल, बर्फ, कोल्ड स्टोरेज यांची सुविधा उपलब्ध झाली आहे. करंजा येथील मासळी बाजार हे राज्यातील मोठे बाजारपेठ आहे. येथून मासळी थेट मुंबई, पुणे, नाशिक येथे पाठवली जाते, पण मासेमारीसमोर आव्हानेही आहेत. हवामान बदलामुळे मासळीची उपलब्धता कमी झाली आहे. एलईडी लाईट फिशिंगमुळे लहान मासेही पकडले जातात, त्यामुळे सागरी साखळी धोक्यात आली आहे. बंदरातील वाढती वाहतूक, ऑइल स्पिल यामुळे मासेमारी क्षेत्र कमी होत आहे. तरुण पिढीला मासेमारीत रस तितकासा नाही. ते सिडको, जेएनपीटीमध्ये नोकरी करणे पसंत करतात.

सरकारने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे. विशिष्ट काळात मासेमारी बंद ठेवावी, जेणेकरून माशांची पैदास होईल. लहान जाळी, एलईडी लाईटचा वापर टाळावा. 'केरळ मॉडेल'प्रमाणे मच्छीमार सहकारी संस्थांनी एकत्र येऊन मासळीवर प्रक्रिया उद्योग सुरू करावा. सुकट, मासळी लोणचे, रेडी टू कूक प्रॉडक्ट्स बनवून त्याचे ब्रँडिंग करावे. 'उरणचा सुकट' या नावाने तो ऑनलाइन विकावा. महिलांचा सहभाग वाढवावा. मासळी सुकवणे, पॅकिंग करणे, विक्री करणे या कामात महिला आघाडीवर असतात. त्यांना बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक मदत, प्रशिक्षण द्यावे. करंजा जेटीचे आधुनिकीकरण करावे. तेथे स्वच्छ मासळी बाजार, कोल्ड स्टोरेज, बर्फ कारखाना उभारावा. पर्यटकांसाठी 'फिश टुरिझम' सुरू करावे. पर्यटकांना बोटीतून मासेमारीचा अनुभव द्यावा, ताजी मासळी खायला द्यावी. यातून मच्छीमारांना जोडधंदा मिळेल.

'ब्लू रिव्होल्यूशन' योजनेचा लाभ घेऊन मच्छीमारांनी शास्त्रोक्त पद्धतीने कोळंबी, खेकडा शेती करावी. खाडी किनाऱ्यावरील पडीक जमिनीत मत्स्यशेती करता येईल. उरणची मासेमारी हा फक्त व्यवसाय नाही, तर संस्कृती आहे. नारळी पौर्णिमेला समुद्राला नारळ अर्पण करणे, होळीला बोंबील खाणे हे रितीरिवाज आहेत. परंपरा जपत आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरली, तर उरणचा मच्छीमार पुन्हा एकदा सुवर्णयुग अनुभवेल. (साभार : इंटनरेट)

# एआय पॉवर्डद्वारे विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित शिक्षणाची नवी दिशा; पनवेलमध्ये सादरीकरण




**पनवेल : प्रतिनिधी**

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), डिजिटल कौशल्ये आणि रोजगाराभिमुख शिक्षणाची जोड मिळावी या उद्देशाने पनवेल येथे प्रसिद्धीमाध्यमांना एआय पॉवर्ड एमएस-सीआयटी, क्लिक कोर्सेस आणि आयलाईक क्रेडिट कोर्सेस या महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी सक्षम बनविण्याचा या उपक्रमांचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना भविष्यकालीन रोजगार, डिजिटल अर्थव्यवस्था आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित जगासाठी तयार करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. "एआय आधारित आधुनिक शिक्षण, डिजिटल साक्षरता, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याला सक्षम बनविणे" हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. यावेळी नटराज कटकधोंड (महाव्यवस्थापक, एम.के. सी. एल., पुणे), जयंत भगत (मेंटॉर, एम. के. सी. एल., कोकण विभाग), मंगेश जाधव (विभागीय समन्वयक, एम. के. सी. एल., कोकण विभाग) आणि सिद्धेश गोसावी (जिल्हा समन्वयक, एम. के. सी. एल., रायगड) उपस्थित होते.

यावेळी एमएससीआयटी या राज्यातील सर्वाधिक लोकप्रिय संगणक साक्षरता अभ्यासक्रमाच्या एआय पॉवर्ड नव्या स्वरूपाचे सादरीकरण करण्यात आले. पारंपरिक संगणक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना आधुनिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित शिक्षण अनुभव देण्यासाठी 'एआय एक्स्पीरियंस मॅप' विकसित करण्यात आला असून विद्यार्थ्यांच्या शिकण्याची पद्धत, गती, आवड आणि प्रगती लक्षात घेऊन वैयक्तिक लर्निंग सपोर्ट दिला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. 'क्रांती' डिजिटल सहाय्यकाचे प्रात्यक्षिक तसेच 'क्रांती' या एआय आधारित अकॅडमिक फॅसिलिटेटरचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांना आधुनिक एआय टूल्सचा वापर करून स्मार्ट नोट्स तयार करणे, रिझ्युम रायटिंग, प्रेझेंटेशन तयार करणे, कंटेंट क्रिएशन, प्रॉडक्टिव्हिटी वाढविणे आणि डिजिटल पद्धतीने अभ्यास करणे यांसारखी आधुनिक स्टडी स्किल शिकविण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी सहज उपलब्ध व्हावी यासाठी मल्टी इंस्टॉलमेंट फी सुविधा उपलब्ध करण्यात आली असून विद्यार्थी घरबसल्या शिक्षण घेऊ शकतील यासाठी 'अॅट-होम लर्निंग फॅसिलिटी' देखील उपलब्ध करून देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. ग्रामीण भागातील तसेच नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा विशेष उपयुक्त ठरणार असल्याचे नमूद करण्यात आले. याशिवाय विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अनुभव आणि यशोगाथा सादर करून या अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांच्या करिअर विकासामध्ये होत असलेला सकारात्मक परिणाम अधोरेखित करण्यात आला.

क्लिक कोर्सेसविषयी माहिती देताना उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार तयार करण्यात आलेले २६५ पेक्षा अधिक स्किल बेस्ड आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. डिजिटल मार्केटिंग, ग्राफिक डिझाईन, वेब डेव्हलपमेंट, पायथॉन प्रोग्रामिंग, डेटा ॲनालिटिक्स, टॅली जीएसटी, ऑटो कॅड, व्हिडिओ एडिटिंग, फायनान्शियल अकाउंटिंग, ऑफिस ऑटोमेशनसारख्या अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांना केवळ प्रमाणपत्र नव्हे तर प्रत्यक्ष रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. स्थानिक उद्योग, व्यावसायिक संस्था आणि विविध कंपन्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना Placement Opportunities उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती देण्यात आली. 'KRANTI'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना Career Guidance, Interview Preparation, Skill Assessment आणि Learning Support उपलब्ध होणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. NEP अनुषंगाने आयलाईक क्रेडिट कोर्सेस तसेच आयलाईक क्रेडिट कोर्सेस हे अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) अनुषंगाने विकसित करण्यात आले असून उच्च शिक्षण संस्थांमध्ये Skill-Based आणि Credit-Oriented शिक्षणाला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना Academic Credits, Industry Exposure, Practical Learning आणि रोजगाराभिमुख कौशल्ये एकाच वेळी मिळावीत यासाठी हे अभ्यासक्रम उपयुक्त ठरत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी कचऱ्याचे साम्राज्य



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगर परिषदेने श्रीवर्धन शहरातील कचरा उचलण्याचे, गटारे साफ करण्याचे व समुद्र किनारपट्टीवरील साफसफाई करण्याचे कंत्राट एका खासगी कंपनीला दिले होते. या कंपनीच्या निविदेची मुदत संपल्यामुळे मागील दोन महिन्यांपासून हे काम बंद पडले होते. आता नवीन निविदा मंजूर झालेली असून कामाची वर्कऑर्डर सुद्धा देण्यात आलेली आहे. कंत्राटी सफाई कामगार कामावर हजर झाल्याचे चित्र शहरामध्ये पहायला मिळत आहे. असे असतानाही श्रीवर्धन समुद्रकिनारा अस्वच्छ असून त्याची योग्य पद्धतीने सफाई लवकरात लवकर करून घ्यावी, अशी मागणी पर्यटकांसह नागरिकांमधून केली जात आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनारी सुशोभित असा धूप प्रतिबंधक बंधारा बांधलेला आहे. या बंधाऱ्यावरती गेले कित्येक दिवसात झाडू मारला नसल्यामुळे वाळू पसरलेली आहे. त्याचप्रमाणे पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिकच्या पिशव्या, इतर कचरा, खाद्यपदार्थांचे कंटेनर्स, प्लास्टिकचे ग्लास व फुटलेल्या बिअरच्या बाटल्या यांचा खच पडलेला पहायला मिळतो, तर किनारपट्टीवर असलेल्या वाळूच्या भागामध्येदेखील मोठ्या प्रमाणावर पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिकच्या पिशव्या यांचा कचरा जमा झालेला आहे. हा कचरा उचलण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने बनवलेली मशीन नगर परिषदेने आणलेली आहे, मात्र या मशीनचा वापर हा अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने किनारपट्टीवरील कचरा तसाच आहे.

याबाबत श्रीवर्धन नगर परिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे यांच्याकडून माहिती घेतली असता, कचरा उचलण्याच्या कामाची वर्कऑर्डर दोनच दिवसांपूर्वी दिलेली असून लवकरच कामगार कामावर रूजू होऊन शहर स्वच्छ करतील, असे सांगण्यात आले.

# महाड एसटी स्थानकात प्रसाधनगृहाच्या सांडपाण्याने दुर्गंधी; प्रवासी हैराण

**महाड : प्रतिनिधी**

महाड एसटी बसस्थानक परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या सार्वजनिक प्रसाधनगृहातील मलमूत्र व सांडपाण्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी निर्माण झाली आहे. या प्रकारामुळे स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून असून प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



महाड एसटी बस स्थानकात अनेक वर्षांपासून प्रवाशांसाठी सुसज्ज प्रसाधनगृहाची मागणी करण्यात येत होती. जुने प्रसाधनगृह अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने प्रवाशांकडून सातत्याने नाराजी व्यक्त केली जात होती. त्यानंतर मंत्री भरत गोगावले यांच्या प्रयत्नांतून नवीन प्रसाधनगृहाची उभारणी करण्यात आली. या नवीन प्रसाधनगृहाचे लोकार्पणही गेल्या वर्षी करण्यात आले होते.

प्रसाधनगृह उभारताना शोषखड्डा किंवा मलमूत्र व सांडपाण्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक टाकी उभारण्यात आल्याचे दिसत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी या ठिकाणचे मलमूत्र व सांडपाणी पाईपद्वारे थेट नगर परिषदेच्या रस्त्यालगतच्या उघड्या नाल्यात सोडले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

प्रांत कार्यालयाकडून उजव्या दिशेने छत्रपती शिवाजी महाराज मार्गाकडे वळताना रस्त्याच्या कोपऱ्यावरील उघड्या गटारात हे सांडपाणी जमा होत असल्याचे दिसून येत आहे. त्या ठिकाणी पाण्याचा योग्य निचरा होत नसल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली आहे. परिणामी तोंड व नाक झाकून या मार्गाने जावे लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले. परिसरातील रहिवाशांच्या आरोग्यावरदेखील याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, एसटी प्रशासनाकडून परिसरात संरक्षक भिंतीचे काम सुरू असताना संबंधित भाग वगळण्यात आल्याचेही समोर आले आहे. तसेच त्या भागात मोठ्या प्रमाणावर माती टाकून जागा बुजविण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे.

मलमूत्रयुक्त भागात कोणतीही योग्य स्वच्छता प्रक्रिया न करता मजूर व कर्मचाऱ्यांना कामावर लावणे हे अमानवीय असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे एसटी प्रशासन आणि नगर परिषदेने संयुक्तपणे पुढाकार घेऊन सांडपाण्याच्या व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# माणगाव तालुक्यात बकरी ईद उत्साहात साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात गुरुवारी (दि.२८) ईद-उल-अजहा म्हणजेच बकरी ईद सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. बकरी ईदची सामुदायिक नमाज अदा केल्यावर मुस्लिम बांधवानी एकमेकांना गळाभेट आलिंगन देत शुभेच्छा दिल्या. हिंदू बांधवांनीही मुस्लिम बांधवांची घरोघरी भेट घेऊन तसेच दूरध्वनीवरून ईदच्या शुभेच्छा दिल्या.

बकरी ईदनिमित्त तालुक्यात सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जुने माणगाव मस्जिद मोहल्ला, बाजारटेप मोहल्ला, नाणोरे, लोणशी मोर्बा, निजामपूर, दहिवली, दहिवली कोंड, तारणा, वडवली, साई, मांजरवणे, गोरेगाव, टेमपाले, लाखपाले, वणी, पुरार, हारकोळ आदी मुस्लिम वस्ती मोठी असलेल्या सर्व गावांतून बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आली. जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जाम मशिदीत मुस्लिम बांधवांनी गुरुवारी सकाळी बकरी ईदची सामुदायिक नमाज अदा केली. यावेळी मौलाना हाजीमिया जामदार यांनी कुराणाचे वाचन करून उपस्थित मुस्लिम बांधवांना ईदचे महत्त्व सांगितले.

राजपचे माजी सभापती ॲड. राजीव साबळे, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, आनंद यादव, माजी सभापती संगीता बक्कम, उपनगराध्यक्ष रिया उभारे, उद्योजक नितीन बामगुडे, सुधीर पवार, बाबुराव निंबाळकर, डॉ.अजय मेहता, माजी उपनगराध्यक्ष राजेश मेहता, रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, पाणीपुरवठा सभापती अजित तारलेकर, नगरसेवक दिनेश रातवडकर, माजी नगरसेवक सिराज परदेशी, अकबर परदेशी, चॅरीझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, किशोर झेमसे, राकेश पडवळ, उद्योजक अरुण क्षिरसागर, शंकर शिंदे, सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे, रवींद्र मोरे, निलेश थोरे, नितीन दसवते, प्रसाद धारिया, भालचंद्र खाडे, प्रवीण बागवे, ज्येष्ठ पत्रकार अरुण पवार, राकेश जाधव, एकता ग्रामीण क्रिकेट असोसिएशन माणगाव संस्थापक राहुल दसवते, सचिन गोरेगावकर, मंगेश पाटील, रामदास पवार, नयन दसवते, माणगाव पतसंस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, कार्यकर्ते यांनी नमाज झाल्यावर मशीद ठिकाणी व घरोघरी जाऊन मुस्लिम बांधवांची भेट घेत त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या तसेच अनेक हिंदू बांधवांनी प्रत्यक्षात भेटून व दूरध्वनीवरून मुस्लिम शुभेच्छा दिल्या.



# वणव्यात होरपळलेल्या रोपांना मिळाले नवजीवन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील मोर्बा रोड परिसरात सामाजिक संघटना आणि वनविभागाच्या माध्यमातून दुतर्फा वृक्षलागवड करण्यात आली होती. भविष्यात हा परिसर हिरवागार व्हावा, प्रदूषण कमी व्हावे आणि पुढील पिढ्यांना शुद्ध पर्यावरण मिळावे या उदात्त हेतूने लावलेली ही कोवळी रोपे काही अज्ञात समाजकंटकांनी लावलेल्या वणव्यात होरपळून गेली. या रोपांना नवजीवन मिळाले आहे.

आगीच्या तीव्र झळांमुळे अनेक रोपांची पाने, फांद्या आणि नाजूक पालवी पूर्णपणे जळून खाक झाली होती. काही रोपे अक्षरशः मरणासन्न अवस्थेत उभी होती. उन्हाच्या तीव्र झळा, पाण्याचा अभाव आणि आगीचा तडाखा यामुळे ही हिरवी स्वप्ने संपुष्टात येणार की काय, अशी भीती निर्माण झाली होती. ही विदारक परिस्थिती पाहून पत्रकार अरुण पवार यांचे मन हेलावून गेले. "ही झाडे बोलू शकत नाहीत, पण त्यांनाही जगायचे आहे," या भावनेतून त्यांनी या कोवळ्या रोपांना वाचवण्याचा निर्धार केला. परिसरात पाण्याची कोणतीही सोय नसतानाही त्यांनी हार मानली नाही.



मोर्बा रोडवरून दररोज मोठ्या संख्येने पर्यटक आणि वाहनचालक प्रवास करतात. अनेक जण अर्धवट पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या रस्त्याकडेला फेकून देतात. इतरांसाठी तो फक्त कचरा होता, पण अरुण पवार यांनी त्यातच जीवन शोधले. त्यांनी परिसरातील फेकून दिलेल्या बाटल्या गोळा केल्या आणि त्यामधील उरलेले पाणी या तहानलेल्या रोपांच्या मुळाशी घालण्यास सुरुवात केली. कचऱ्यात फेकलेल्या त्या काही थेंब पाण्याने आता चमत्कार घडवायला सुरुवात केली आहे. जळून गेलेल्या रोपांना पुन्हा नवी पालवी फुटू लागली आहे. मृतप्राय वाटणाऱ्या झाडांमध्ये पुन्हा जीवन संचारत आहे. या रोपांच्या वाढत्या हिरवाईतून पर्यावरण वाचवण्याची आशा पुन्हा जागी होत आहे.

या उपक्रमातून "इच्छाशक्ती असेल तर टाकाऊ वस्तूंमधूनही जीवन फुलवता येते" हा प्रेरणादायी संदेश समाजासमोर आला आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत अशाच पद्धतीने फेकून दिलेल्या बाटल्यांतील पाण्याचा वापर करून या झाडांचे संवर्धन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

विशेष म्हणजे, यापूर्वीही त्यांनी मोर्बा रोडवरील झाडांच्या रोपांना काठ्या बांधून संरक्षण दिले होते. वादळामुळे निपचित पडलेल्या झाडांना टेकू देऊन पुन्हा उभे करण्याचे कामही त्यांनी गुरू माऊली संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने केले होते.

## सावंतवाडी रेल्वेस्थानकाला स्व. मधु दंडवते यांचे नाव

# कोकण विकास समितीने मानले सरकारचे आभार

**चौक : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेचे भाग्यविधाते, माजी रेल्वेमंत्री मधु दंडवते यांचे नाव सावंतवाडी रेल्वे टर्मिनलला देण्यात यावे, यासाठी राज्य सरकारने मंजुरी दिली असून कोकण विकास समितीने सरकारचे आभार मानले आहेत.



जून २०२३मध्ये कोकण विकास समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आणि चर्चाही केली होती. तत्कालीन आमदार व तथा विद्यमान मंत्री भरत गोगावले, आमदार प्रशांत ठाकूर हेही होते. मुख्यमंत्र्यांनी हा प्रस्ताव परिवहन विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांकडे अहवालासाठी पाठविला. परिवहन विभागाने २७ जून २०२४ रोजी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी यांच्याकडे आवश्यक अहवाल मागविला. याच काळात कोकण विकास समितीच्या वतीने जिल्हाधिकारी तावडे व त्यांचे सहाय्यक शिंदे यांच्याशी चर्चा करण्यात आली.

जानेवारी २०२५मध्ये सावंतवाडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वासुदेव नाईक यांच्याशी चर्चा झाली असता, त्यांनी मळगाव ग्रामपंचायतीकडून अहवाल मागविण्यात आल्याची माहिती दिली. मार्च २०२५मध्ये पंचायत समितीने मळगाव ग्रामपंचायतीचा अहवाल प्राप्त करून तो सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला. सप्टेंबर २०२५मध्ये या विषयाची माहिती मंत्री नितेश राणे यांना देण्यात आली. त्यांनीही सकारात्मक भूमिका घेत जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून आवश्यक सहकार्य करण्याची विनंती केली. आमदार तथा पुनर्विकास व समूह विकास अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनीही सहकार्य केले.

सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी यांनी सविस्तर अहवाल कोकण विभागीय आयुक्तांकडे सादर केला. ऑक्टोबर २०२५मध्ये मुद्देनिहाय अहवाल परिवहन विभाग, मंत्रालय येथे पाठविण्यात आला. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कक्ष अधिकारी विद्याराणी पवार, सहसचिव कोळेकर, अप्पर मुख्य सचिव (परिवहन) तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करण्यात आला. २६ मेच्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस व त्यांच्या सहकारी मंत्री यांनी लोकनेते मधु दंडवते टर्मिनल या नावाने सावंतवाडी रेल्वेस्थानकाचे नामकरण करण्यास मंजुरी दिली.

स्व. मधु दंडवते यांनी कोकणाच्या विकासासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाची दखल घेत कोकणवासीयांच्या मनातील भावना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कोकण विकास समिती व त्यांचे सदस्य अनंत सावंत, अक्षय महापदी, प्रभानंद रावराणे, इतर सदस्यांचे योगदान यशस्वी ठरले असून महाराष्ट्र शासनाने त्यावर अधिकृत शिक्कामोर्तब केले. त्यामुळे राज्य सरकारचे मनपूर्वक आभार व्यक्त केल्याचे समितीचे संस्थापक अध्यक्ष जयवंत दरेकर यांनी सांगितले.

# महाडमध्ये गोदाम आगीत जळून खाक

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील मुख्य बाजारपेठेत बुधवारी मध्यरात्री भीषण अग्नितांडव घडले. महात्मा गांधी मार्गावरील सुभाष शेठ यांच्या संजय ऑइल ट्रेडिंग कंपनीच्या गोदामाला लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण गोदाम जळून खाक झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी लाखो रुपयांची वित्तहानी झाली आहे.

घाऊक व्यापारी असल्याने या गोदामामध्ये मोठ्या प्रमाणावर खाद्यतेलाचा साठा, माचीस तसेच अन्य साहित्य ठेवण्यात आले होते. त्यामुळे आग लागल्यानंतर काही क्षणांतच तिने रौद्ररूप धारण केले. गोदामालगत राहणाऱ्या वैष्णव कुटुंबियांना प्रथम धुराचे व आगीचे संकेत



मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ गोदाम मालक सेऊल शेठ यांना याची माहिती दिली. त्यावेळी शेठ आपल्या कुटुंबासह त्या ठिकाणी वास्तव्यास होते. घटनास्थळी धाव घेतल्यानंतर आगीचा भडका उडाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिस्थिती गंभीर होत असल्याने वैष्णव कुटुंबातील चिंतन, जे सिस्केप या रेस्क्यू टीमचे सदस्य आहेत त्यांनी प्रसंगावधान राखत गॅलरीतून सेऊल शेठ, त्यांची पत्नी व दोन मुलांचे तत्काळ रेस्क्यू केले. त्यामुळे जीवितहानी टळली.

दरम्यान, घटनेची माहिती समजताच कॅबिनेट मंत्री तथा स्थानिक आमदार भरत गोगावले यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा आढावा घेतला.

# नंदकुमार म्हात्रे यांची शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी फेरनिवड

**रोहा : प्रतिनिधी**

श्री दिनाभाई मोरे शिक्षण मंडळ सानेगाव या शिक्षण संस्थेची पंचवार्षिक निवडणूक साने गुरुजी विद्यानिकेतन प्रशालेत यशवंत खराडे यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सुरुवातीच्या दीड वर्षाकरिता अध्यक्ष म्हणून नंदकुमार नामदेव म्हात्रे यांची फेरनिवड, तर त्या पुढील साडेतीन वर्षाकरिता संतोष नथु भोईर यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

यावेळी मोतीराम गीजे, विलास दिवकर, धर्मा ठाकूर, पांडुरंग भोईर, नथुराम ठाकूर, पृथ्वीराज पाटील, बाळू पाटील, अनंत पाटील, काशिनाथ तांबडे, नामदेव तांबटकर, चंद्रकांत भोईर, महेश शिंदे, सीताराम घाग, काशिनाथ धुमाळ, हरिश्चंद्र पाटील, राम गीजे, रामचंद्र म्हात्रे, पाच शाळा अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ आदी उपस्थित होते.

पुढील पाच वर्षाकरिता उपाध्यक्ष म्हणून बाळू लखमा पाटील, खजिनदार मोहन जानू ठाकूर, सल्लागार ॲड. विवेक मोरे, सचिव मनोहर मोरे यांची निवड करण्यात आली आहे. नव्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# आंबेवाडी ते निवी कालवा दुरूस्तीचे काम निकृष्ट; बळीराजा फाऊंडेशनचा आरोप, चौकशीची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

तब्बल दहा-बारा वर्षे रखडलेल्या आंबेवाडी ते निवी कालव्याची दुरुस्ती आणि पाणी आंदोलनाला बळीराजा फांऊडेशनच्या नेतृत्वाखाली यश आले. दोन-तीन वर्षात झालेल्या दुरुस्ती कामांतील अनेक एस्कॅप, सायपन मुख्यतः लायनिंग काँक्रीट कामे निकृष्ट करण्यात आल्याचा आरोप होत आहे.

पाले खुर्द गावानजीक केलेल्या लायनिंग काँक्रीट दुसऱ्याच वर्षी उखडत असल्याचे धक्कादायकपणे दिसून आले. लायनिंग कामांना मोठ्या प्रमाणात भेगा पडल्यात, कामे निकृष्ट झाल्याने बिलांची सखोल चौकशी करावी, संबंधीत ठेकेदारांना काळ्या यादीत टाकावे अशी मागणी करत प्रशासनाविरोधात लवकरच



आक्रमक भूमिका घेऊ, असा इशारा बळीराजा फांऊडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी दिला आहे.

कालवा एस्कॅपची अनेक कामे निकृष्ट झाली. लिकेज् वाढले. मागील वर्षात पाले खुर्द येथील कालव्याचे केलेले लायनिंग मास काँक्रीट पूर्णतः उखडत चालले आहे. इतर ठिकाणचे लायनिंग कामेही उखडण्याला सुरुवात झालीय. पाणी सोडण्याबाबत नियोजन नाही. अधिकाऱ्यांत समन्वय नाही हे वारंवार समोर येत असल्याने कालवा दुरुस्ती, पाण्यासाठी आंदोलन उभारणाऱ्या बळीराजा फांऊडेशनने स्पष्ट नाराजी व्यक्त केली आहे.

शासनाच्या करोडो रुपये निधीचा अपव्यय झाला आहे. कामांची चौकशी करावी, दोषींवर कारवाई करावी अशी मागणी करणार असल्याची प्रतिक्रिया सचिव ॲड दीपक भगत यांनी दिली.

दरम्यान, अजूनही अनेक ठिकाणी कालवा मोठ्या प्रमाणात लिकेज् आहे. आंबेवाडी, संभे भागातील शेतकऱ्यांचे नुकसान होते. ही दुरुस्ती कामेही मुदतीत पूर्ण करावीत. पुढील हंगामात कालव्याचे पाणी पूर्ववत करावे, कामे दर्जेदार करावीत, अशी आग्रही मागणीही बळीराजा फाऊंडेशनने केली आहे.

# राजस्थानची क्वालिफायर २मध्ये 'रॉयल' एण्ट्री!

## वैभव-जोफ्रामुळे हैदराबादची दाणादाण





**चंदिगड : वृत्तसंस्था**

वैभव सूर्यवंशीच्या विक्रमी खेळीनंतर गोलंदाजीत जोफ्रा आर्चरने केलेल्या भेदक माऱ्याच्या जोरावर राजस्थान रॉयल्सच्या संघाने एलिमिनेटरमध्ये हैदराबादला पराभूत करत क्वालिफायर २मध्ये एन्ट्री मारली आहे.

पहिल्यांदा फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीच्या २९ चेंडूतील ९७ धावांच्या वादळी खेळीच्या जोरावर राजस्थानच्या संघाने निर्धारित २० षटकात ८ बाद २४३ धावा करत हैदराबादसमोर २४४ धावांचे टार्गेट सेट केले होते. त्यानंतर जोफ्रा आर्चरन तीन षटकात तीन विकेट्स घेत पॉवर प्लेमध्येच हैदराबादच्या फलंदाजीचा फुगा फोडला. या सामन्यातील पराभवासह हैदराबादचा स्पर्धेतील प्रवास इथेच संपला. आता राजस्थानचा संघ क्वालिफायर २च्या लढतीत गुजरात टायटन्सला भिडणार आहे. यातील विजेता यंदाच्या हंगामातील फायनलमध्ये रॉयल चॅलेंसर्ज बंगळुरूविरुद्ध खेळताना दिसेल.

न्यू चंदिगड येथील मुल्लानपूरच्या मैदानात नाणेफेक जिंकल्यावर पॅट कमिन्स याने पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचा हा निर्णय वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल जोडीने व्यर्थ ठरवला. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ८ षटकात १२५ धावांची भागीदारी रचली. यात वैभवने ख्रिस गेलचा एका हंगामात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम मोडत २९ चेंडूत ९७ धावांची खेळी केली. यशस्वी २९ चेंडूत २९ धावा करून परतल्यावर ध्रुव जुरेल याने २१ चेंडूत ५० धावांची कडक फलंदाजी केली. रियान परागने १२ चेंडूत २६ धावांचे योगदान दिले. अखेरच्या पाच षटकात राजस्थानच्या संघाने ३६ धावांत पाच विकेट्स गमावल्या, पण त्यातही राजस्थानच्या संघाने आयपीएलमधील आपली सर्वोच्च धावसंख्या उभारली. सनरायझर्स हैदराबादकडून प्रफुल हिंगे याने सर्वाधिक तीन, तर शिवांग कुमार, नितीश कुमार रेड्डी आणि एशान मलिंगा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना जोफ्रा आर्चरने पहिल्याच षटकातील दुसऱ्या चेंडूवर अभिषेक शर्माला शून्यावर माघारी धाडले. दुसऱ्या षटकात त्याने ईशान किशनच्या खेळीला ब्रेक लावला. त्याने ११ चेंडूत ३३ धावांची खेळी केली. नांद्रे बर्गरने स्मरण रवीचंद्रनला स्वस्तात तंबूत धाडल्यावर जोफ्राने आपल्या पहिल्या स्पेलमधील तिसऱ्या षटकात ट्रॅविस हेडला १७ धावांवर बाद करत पॉवर प्लेमध्येच हैदराबादची अवस्था ४ बाद ५२ अशी केली. इथेच सामना राजस्थानच्या बाजूने सेट झाला.

मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना नितीश कुमार रेड्डी ३८ (२०) आणि सलिल अरोराने ३५(२१) धावा करत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण पॉवर प्लेमध्ये गमावलेल्या विकेट्समुळे हैदराबाद संघाला सावरता आले नाही. राजस्थानकडून जोफ्रा आर्चरने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. नांद्रे बर्गर आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या. याशिवाय यशराज पुंजा आणि सुशांत मिश्रा यांनी प्रत्येकी एक गडी बाद करीत योगदान दिले.

# राज्य पॉवरलिफ्टिंग इक्विप्ड गटाची स्पर्धा मुंबईत होणार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिनियर, ज्युनिअर, सब ज्युनिअर, मास्टर्स पुरुष व महिला आणि अंध व गतिमंद दिव्यांग गटाची इक्विप्ड राज्य पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा २९ ते ३१ मे रोजी मुंबईतील वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात आयोजित करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या क्रीडा धोरण अंतर्गत आलेल्या सूचनांनुसार ऑनलाइन नावे नोंदणी झालेल्या खेळाडूंना स्पर्धेत प्रवेश देण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटनासाठी क्रीडाप्रेमी आमदार कालिदास कोळंबकर उपस्थित राहणार आहेत, तर बक्षीस वितरण समारंभासाठी महापौर रितू तावडे, आमदार तमिल सेल्वन, आमदार प्रमोद जठार, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सचिव संजय शेटे आदी उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेत सब ज्युनिअर गटासाठी (१२ ते १८ वर्ष) २००८ ते २०१४ या वर्षात जन्मलेली खेळाडू मुले-मुलीभाग घेऊ शकतील, तर ज्युनिअर मुले-मुली गटासाठी (१९ ते २३ वयोमर्यादा) २००३ ते २००७ या वर्षात जन्मलेले खेळाडू भाग घेऊ शकतील. सर्व खेळाडूंनी वेळेवर वजनासाठी उपस्थित राहावे. स्पर्धेसाठी ठिकाणी कोणत्याही खेळाडूने उत्तेजक घेऊ नये, अशी सूचना महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सरचिटणीस संजय सरदेसाई यांनी केली आहे.

# वाशीत रविवारी ग्रँड फुटबॉल टूर्नामेंट

**नवी मुंबई : बातमीदार**

निधी सोशल चॅरिटेबल ट्रस्ट आणि गणेश कृपा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रँड फुटबॉल टूर्नामेंट २०२६चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ३१ मे रोजी वाशी सेक्टर १ ए येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात पार पडणार असल्याचे आयोजक सामाजिक कार्यकर्त्या आरती विचारे यांनी सांगितले.

स्पर्धेत प्रत्येक सामना २० मिनिटांचा असणार असून त्यात प्रत्येकी १० मिनिटांचे दोन हाफ खेळवले जाणार आहेत. स्पर्धेसाठी संघ नोंदणी शुल्क ठेवण्यात आले आहे. मर्यादित संघांना प्रवेश दिला जाणार असल्याने इच्छुक संघांनी लवकरात लवकर नोंदणी करावी तसेच फुटबॉलप्रेमींनी स्पर्धेला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# वैभव सूर्यवंशी बनला आयपीएलचा नवा सिक्सर किंग

## ख्रिस गेलचा महारेकॉर्ड मोडला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यू चंडीगडच्या मुल्लानपूरच्या मैदानातील एलिमिनेटरच्या सामन्यात वैभव सूर्यवंशी याने नवा इतिहास रचला आहे. राजस्थानच्या डावाची सुरुवात करताना वैभव सूर्यवंशीने पॉवर प्लेमध्येच सात षटकार मारत एका हंगामात सर्वाधिक षटकार मारण्याचा युनिव्हर्सल बॉस ख्रिस गेलचा विक्रम मोडीत काढला आहे. एवढेच नाही तर प्लेऑफ्समध्ये सर्वात जलद अर्धशतकासह त्याने सुरेश रैनाच्या विक्रमाची बरोबरी केली. फक्त १६ चेंडूत त्याने अर्धशतक साजरे केले.

याआधी एका आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर होता. कॅरेबियन स्फोटक फलंदाजाने २०१२च्या हंगामात ५९ षटकार खेचले होते. १४ वर्षांपासून अबाधित असलेला महारेकॉर्ड विक्रम वैभव सूर्यवंशी याने १५व्या सामन्यात मोडीत काढला.

### जैस्वाललाही टाकले मागे

*एलिमिनेटरमधील जलद अर्धशतकी खेळीसह एका आयपीएल हंगामात अनकॅप्ड खेळाडूच्या रूपात सर्वाधिक धावा करण्याचा यशस्वी जैस्वाल याचा विक्रमही वैभवने मोडला. २०२३च्या हंगामात यशस्वीने ६२५ धावा केल्या होत्या.*

# नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत दिव्या देशमुखचा कोनेरू हम्पीवरही विजय



**गुकेश, प्रज्ञानंदची दुसऱ्या फेरीत हार**

**ओस्लो : वृत्तसंस्था**

युवा ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने गतवर्षीच्या विश्वचषक स्पर्धेतील कामगिरीची पुनरावृत्ती करताना अनुभवी भारतीय सहकारी कोनेरू हम्पीवर नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेतही विजय मिळवला. पदार्पणाच्या नॉर्वे स्पर्धेत दिव्याने चमकदार कामगिरी केली असून पहिल्या फेरीत तिने जगज्जेत्या चीनच्या जू वेन्जूनला पराभवाचा धक्का दिला होता. दिव्याने या दोन्ही लढत 'आर्मागेडॉन' टायब्रेकरमध्ये जिंकल्या. खुल्या विभागात, जगज्जेता दोम्माराजू गुकेश आणि आर. प्रज्ञानंद यांना मात्र दुसऱ्या फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले.

महिला विभागात दुसऱ्या फेरीत पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना दिव्याने हम्पीच्या राजावर जोरदार हल्ला चढवला. दोन्ही खेळाडूंनी विरुद्ध बाजूला किल्लाबंदी केल्याने सामना अत्यंत तांत्रिक झाला, पण सक्रिय हत्ती आणि अश्वाच्या मदतीने दिव्याने सातत्याने आक्रमण कायम ठेवले. तिने हम्पीवर दडपण राखले, मात्र तिला निर्णायक चाल रचता न आल्याने या लढतीचा पारंपरिक डाव बरोबरीत सुटला. मग 'आर्मागेडॉन'मध्ये अश्वांच्या प्रभावी हालचाली आणि वजिराच्या बाजूने चांगला खेळ करत दिव्याने विजय मिळवला.

दोन फेऱ्यांनंतर दिव्याच्या खात्यावर तीन गुण जमा झाले आहेत. हम्पीला पहिल्या फेरीत बिबिसारा असाउबायेवाने पारंपरिक डावात पराभूत केले होते, मात्र दुसऱ्या फेरीत दिव्याविरुद्ध किमान पारंपरिक डाव बरोबरीत सोडवल्याने हम्पीला एक गुण मिळवता आला.

खुल्या विभागात, प्रज्ञानंद फ्रान्सचा ग्रँडमास्टर अलिरेझा फिरुझाकडून पराभूत झाला. या विजयामुळे फिरुझा सहापैकी सहा गुण मिळवून अग्रस्थानी पोहचला आहे. गुकेशने अमेरिकेच्या वेस्ली सोविरुद्ध पारंपरिक डाव बरोबरीत राखला, पण 'आर्मागेडॉन' टायब्रेकरमध्ये त्याला पराभव पत्करावा लागला. मॅग्नस कार्लसनने विजयी पुनरागमन करताना जर्मनीच्या व्हिन्सेन्ट केमेरला 'आर्मागेडॉन'मध्ये नमवले.

# राष्ट्रीय तायक्वांन्दो स्पर्धेसाठी सुभाष पाटील प्रमुखपदी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इंटरनॅशनल इनडोअर स्टेडियम, हल्दवानी (नैनिताल) येथे उत्तराखंड तायक्वांन्दो असोसिएशन व तायक्वांन्दो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित ओपन राष्ट्रीय स्पर्धा २९ ते ३१ मेदरम्यान होणार आहे. यासाठी रायगडचे सुपुत्र तायक्वांन्दोचे आंतरराष्ट्रीय पंच व सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट सुभाष पाटील यांची यांची स्पर्धा प्रमुख म्हणून निवड झाली आहे.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल रायगड तायक्वांदो असोसिएशन, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे पदाधिकारी-प्रशिक्षक, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर यांनी सुभाष पाटील यांचे अभिनंदन केले.




# क्वालिफायर २मध्ये आज गुजरात-राजस्थान भिडणार!

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात पोहचली आहे. स्पर्धेतील पहिल्या क्वालिफायर सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात बंगळुरूने एकतर्फी विजय मिळवून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले, तर एलिमनेटरच्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा सामना राजस्थान रॉयल्सविरुद्ध पार पडला. हा सामना राजस्थान रॉयल्स संघाने जिंकून क्वालिफायर २मध्ये प्रवेश केला आहे. दरम्यान क्वालिफायर २मध्ये राजस्थान रॉयल्सचा सामना गुजरात टायटन्स संघाविरुद्ध होणार आहे.

स्पर्धेतील क्वालिफायर २ फेरीतील सामना २९ मे रोजी न्यू चंदिगडमध्ये खेळवला जाणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल, तर नाणेफेक अर्ध्या तासाआधी म्हणजेच ७ वाजता होईल. हा सामना स्टार स्पोर्ट्स आणि जियो हॉटस्टारवर लाईव्ह पाहू शकता.

गुजरात टायटन्सचा संघ गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी होता. क्वालिफायर १मध्ये जोरदार लढत होणार असे वाटले होते, पण हा सामना एकतर्फी राहिला. आता राजस्थान रॉयल्सचा संघदेखील सनरायझर्स हैदराबादविरुद्ध एकतर्फी विजय मिळवून आला आहे. त्यामुळे गुजरातला जर हा सामना जिंकून अंतिम फेरीत आपल्या घरच्या मैदानावर खेळायचं असेल, तर या सामन्यात आणखी जोर लावावा लागणार आहे. दुसरीकडे युवा कर्णधार रियान पराग राजस्थान रॉयल्स संघाला अंतिम फेरीत पोहचवण्याच्या प्रयत्नात असणार आहे.

या स्पर्धेतील अंतिम सामना ३१ मे रोजी अहमदाबाद येथील जगातील सर्वात मोठ्या नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. त्याआधी क्वालिफायर २ सामन्याचा थरार रंगणार आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ अंतिम फेरीत प्रवेश करणारा पहिला संघ ठरला आहे. आता गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात जिंकणारा संघ फायनलमध्ये बंगळुरूशी दोन हात करेल.

# मुंबई बुद्धिबळ स्पर्धेत रेयांशने अव्वल मानांकित श्रेयांशला नमवले



**मुंबई : प्रतिनिधी**

रेयांश व्यंकट (१९०६) याने अव्वल मानांकित श्रेयांश सोमय्या (१९७३) याचा पराभव करून अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर स्पर्धेच्या चौथ्या सत्रात सहाव्या फेरीनंतर एकेरी आघाडी मिळवली. त्याने सर्वाधिक सहा गुणांसह स्पर्धेत दबदबा राखला आहे.

मुंबई चेस सेंटरच्या वतीने पेडर रोड येथील रशियन हाउसमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत रेयांशने शानदार खेळाचे प्रदर्शन केले. काळ्या मोहऱ्यांसह खेळताना रेयांशने सुरुवातीपासूनच सामन्यावर नियंत्रण राखले. सुरुवातीला काहीसा सावध पवित्रा घेतल्यानंतर रेयांशने आक्रमक चाली रचत श्रेयांशला दबावात आणले. त्याने आपल्या राजासह प्याद्यांच्या जोरावर श्रेयांशवर सतत दबाव कायम ठेवला. अखेर रेयांशने लढतीवर पूर्ण नियंत्रण मिळवल्यानंतर सलग सहावा विजय नोंदवला आणि अव्वल स्थान पटकावले.

दुसऱ्या पटावर जान्हवी सोनेजी (१७९२) हिने दमदार फॉर्ममध्ये असलेल्या ध्रुव मुठे (१६१९) याचा पराभव करून ५.५ गुणांसह संयुक्त दुसरे स्थान गाठले. स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत जान्हवीने सर्वांचे लक्ष वेधले आहे.

अव्वल मानांकित शार्दूल कदम आदित्य (१९१७) याने अहान कटारुका (१६८६) विरुद्ध विजय मिळवत पुनरागमनाची मालिका कायम राखली. गौरंग भंडारी (१८८९) याने महत्त्वाच्या लढतीत विहान रवी राव (१७२५) याला बरोबरीत रोखले. आता यापुढील लढती अधिक रंगतदार होणार आहेत.








कार्यक्रम : भजन दररोज सायंकाळी ७.०० वाजता

शुक्रवार दि. २९/०५/२०२६ रोजी

ओंकार प्रासादिक भजन मंडळ, खोपटे-उरण
गायिका : मृदुला म्हात्रे, मृणाली ठाकूर
पखवाज : मंदार म्हात्रे, तबला : विनीत ठाकूर

शनिवार दि. ३०/०५/२०२६ रोजी

श्री आदिशक्ती प्रासादिक भजन मंडळ, बोरखार-उरण
गायिका : सौ. प्रगती श्रीकांत डाकी
पखवाज : कु. सिद्धांत म्हात्रे

कार्यक्रम : उत्तरकार्यानिमित्त भजन सकाळी १० ते १२ वा.

रविवार दि. ३१/०५/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा.

राधाकृष्णा बालगोपाळ भजन मंडळ, हरिग्राम-पनवेल
गायिका : संगीत विशारद कु.प्रतिज्ञा सुरेश पाटील
संगीत विशारद कु.तपस्या हनुमान पाटील
पखवाज : संगीत विशारद ॲड.कु.प्रसाद सु.पाटील

शोकाकुल

समस्त कोळी परिवार, उलवे आणि मोरावे


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com